



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६५ वे * अंक ८९ * नांदेड * शनिवार, दि. ४ एप्रिल २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# महाराष्ट्रावर संकटाचे ढग कायम; नांदेडसह १६ जिल्ह्यांना येलो अलर्ट

**मुंबई (प्रतिनिधी)–** मागील काही दिवसांपासून राज्यभरातील विविध भागांमध्ये पावसाने हजेरी लावली आहे. ४ एप्रिल रोजी राज्यातील नांदेड जिल्ह्यासह १६ जिल्ह्यांना येलो अलर्ट भारतीय हवामान विभाग कडून जारी करण्यात आला आहे.

राज्यातील १६ जिल्ह्यांना अवकाळी पावसाचा इशारा देण्यात आला असून अनेक भागांत वादळी वारे, मेघगर्जना आणि विजांचा कडकडाट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

मराठवाड्यात संभाजीनगर, बीड, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली आणि जालना या सर्व जिल्ह्यांना येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. या भागात विजांच्या कडकडाटासह वादळी वारे आणि मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी विशेष खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

यासह कोकणातील पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांना कोणताही अधिकृत अलर्ट देण्यात आलेला नाही. मात्र हवामानात बदल होण्याची शक्यता असून काही भागांत वादळी वाऱ्यासह हलका ते मध्यम पाऊस पडू शकतो. समुद्रकिनारी भागात वाऱ्याचा वेग वाढण्याची शक्यता आहे. पश्चिम महाराष्ट्रात पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा आणि सोलापूर या जिल्ह्यांना कोणताही अधिकृत अलर्ट नाही. तरीही काही भागांत ढगाळ वातावरण राहून विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

उत्तर महाराष्ट्र पाहिलं तर जळगाव आणि अहिल्यानगर या जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. तर धुळे, नंदुरबार आणि नाशिक या जिल्ह्यांमध्ये अलर्ट नसला तरी काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह पावसाच्या सरी कोसळू शकतात.

विदर्भातील अकोला, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. काही भागांत मेघगर्जना आणि वाऱ्यासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. वाशिमसह काही उर्वरित जिल्ह्यांमध्ये हवामान कोरडे राहण्याची शक्यता असली तरी वातावरण ढगाळ राहू शकते. काही ठिकाणी हलक्या स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## बारामती आणि राहुरीच्या रिंगणात काँग्रेसची एन्ट्री!

**पुणे (प्रतिनिधी)–** राज्यातील बारामती आणि राहुरी विधानसभा पोटनिवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने महत्त्वाचा निर्णय घेत दोन्ही मतदारसंघात निवडणूक लढवण्याचा निर्धार केला आहे. पक्षश्रेष्ठींकडून यासाठी हिरवा कंदील मिळाल्याची माहिती समोर आली आहे.

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी गुरूवारी संभाव्य उमेदवारांच्या मुलाखती पार पडल्या असून, स्थानिक पातळीवरील समीकरणांचा आढावा घेण्यात आला. इच्छुकांची संख्या लक्षात घेता पक्ष नेतृत्व योग्य उमेदवार निवडण्यासाठी काळजीपूर्वक निर्णय घेणार असल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी उमेदवार निश्चितीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून, लवकरच अधिकृत घोषणा होण्याची शक्यता आहे. दोन्ही मतदारसंघात मित्रपक्षांशी चर्चा करूनच उमेदवारांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात येणार असल्याची माहिती काँग्रेस सूत्रांकडून मिळाली आहे.

## ट्रम्प यांचे पुन्हा टॅरिफ वॉर; १२० दिवसांचा इशारा देत इराण युद्धादरम्यान थेट १०० टक्के आयात शुल्काची घोषणा

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** गेल्या एक महिन्यापासून अमेरिका - इराणमधील युद्ध सुरु आहे. मध्य पूर्वेमधील संघर्षादरम्यान अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प पुन्हा एकदा टॅरिफ वॉरचे हत्यार उपसलं आहे. ट्रम्प सरकारने व्यापार धोरणात मोठा बदल केला आहे. ट्रम्प यांनी दोन महत्त्वाच्या कार्यकारी आदेशांवर स्वाक्षरी केल्या आहेत. ज्यामुळे अमेरिकेत आयात होणाऱ्या ब्रँडेड प्रिस्क्रिप्शन औषधांवर १०० टक्के शुल्क आकारण्यात येणार आहे. तर पोलाद, ॲल्युमिनियम आणि तांब्याच्या उत्पादनांवरील शुल्क कमी करण्यात आले आहेत.

एएनआयवर अधिकाऱ्याने सांगितलं की, पेटंट असलेल्या उत्पादनांवर १०० टक्के शुल्क लागू होणार आहे. रिशोरिंग योजनेसाठी मान्यता न मिळालेल्या कंपन्यांनी उत्पादित केलेले, भारतातून आयात केलेले कोणतेही पेटंट औषध १०० टक्के शुल्काच्या अधीन असणार आहे, असं त्यांनी स्पष्ट केलं आहे.

सध्या जेनेरिक औषधांना या सवलतीचा लाभ मिळतो, मात्र अधिकाऱ्यांनी असा इशारा दिला आहे की, जर जेनेरिक औषध उद्योगाने आपले उत्पादन वेगाने अमेरिकेत परत हलवले नाही, तर



यात बदल होण्याचे शक्यता आहे.

ट्रम्प प्रशासनाने मोठ्या औषध कंपन्यांना या शुल्कांसाठी १२० दिवसांची मुदत दिल्याचे स्पष्ट केलं आहे. जे या उन्हाळ्याच्या उत्तरार्धात लागू होणार आहे. तर लहान कंपन्यांना पालन करण्यासाठी १८० दिवस त्यांना मिळणार आहे. पण, या आदेशात व्यापक सवलतींचा समावेश असणार आहे. ज्या कंपन्या किंमत निश्चितीच्या उपक्रमांमध्ये सहभागी होण्यास किंवा अमेरिकेत उत्पादन सुविधा स्थापन करण्यास सहमत आहेत, त्या शुल्क लक्षणीयरीत्या कमी करू शकतात किंवा टाळू शकतात, असंही त्यांनी सांगितलं आहे. ज्या कंपन्या आपले उत्पादन अमेरिकेत हस्तांतरित करतात, त्यांच्यासाठी शुल्क २० टक्क्यांपर्यंत कमी करण्यात येणार आहे.

## किवळा साठवण तलावातून १५ मेपासून मिळणार पाणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी किंवा साठवण तलावाच्या माध्यमातून आणखी एक प्रमुख जलस्त्रोत उपलब्ध झाला आहे. या किवळा साठवण तलावातून तरंगत्या पंप हाऊसद्वारे मे महिन्याच्या १५ तारखेपासून असदवन जलशुद्धीकरण केंद्र येथे पाणी घेण्याचा प्रयत्न महापालिकेकडून केला जाणार आहे. या साठवण तलावातील पाण्यामुळे नांदेडकरांची तहान उन्हाळ्यातही भागविली जाणार असून यामुळे नांदेडकरांना पिण्याच्या पाण्यासाठी आणखी एक प्रमुख जलस्त्रोत उपलब्ध झाला आहे.

नांदेड महापालिकेच्या स्थायी समितीचे सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले यांनी गुरुवारी शहरात सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनेचा आढावा घेतला. केंद्र शासनाच्या अमृत २.० या योजनेअंतर्गत नांदेड शहरातील पाणीपुरवठा व्यवस्थेचे बळकटीकरण आणि संलग्नीकरण करणे हे काम हाती घेण्यात आले आहे. यासाठी १७५ कोटी ८९ लाख रुपयांचा निधी मंजूर आहे. ९ ऑक्टोबर २०२४ पासून सुरू झालेल्या याच योजनेतील कामांचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. या योजनेअंतर्गत नांदेड शहरात २०० किलोमीटर अंतरात जलवाहिन्या टाकण्यात येणार आहेत. काळेश्वर येथील पंपगृहाचेही आधुनिकीकरण करण्यात येणार आहे. यासह कोटीतीर्थ ते डंकीनपर्यंत स्वतंत्र जलवाहिनी टाकून पाणी डंकीनपर्यंत आणले जाणार आहे, हे काम जवळपास पूर्ण झाल्याची माहिती यावेळी देण्यात आली. डंकीन येथेच ३५ दशलक्ष लीटर क्षमतेचा जलशुद्धीकरण प्रकल्पही उभारला जाणार आहे. या प्रकल्पासाठी ९ कोटी २३ लाख रुपये खर्च येणार आहे. हे कामही सुरू करण्यात आले आहे. या योजनेअंतर्गत शहरात नऊ जलकुंभही बांधण्यात येत आहेत. अविरत पाणीपुरवठ्यासाठी सोलार पावर प्लांटही बसविण्याचे निश्चित करण्यात आले असून यासाठी ८ कोटी १० लाख रुपये खर्च केले जाणार आहेत.

अमृत २.० योजनेअंतर्गत आसना नदीवर गेट बसवण्यात येणार आहेत. यासाठी जवळपास २.५ कोटी रुपये खर्च केला जाणार आहे. या योजनेअंतर्गत शहरातील कामांना गती द्यावी, असे आदेश स्थायी समिती सभापती गाडीवाले यांनी यावेळी दिले. त्याचवेळी ही कामे दर्जेदार व्हावीत यासाठी अधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे, अशा सूचनाही दिल्या.

शहरातील कोणत्याही भागात पाणीटंचाई होऊ नये याची दक्षता घेण्यात यावी, आगामी काळातील उन्हाळ्याचे दिवस लक्षात घेता पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करण्याच्या सूचनाही सभापती गाडीवाले यांनी दिल्या आहेत.

बैठकीला सभागृह नेते ॲड. महेश कनकदंडे, माजी स्थायी समिती सभापती किशोर स्वामी, संतोष मुळे यांच्यासह शहर अभियंता सुमंत पाटील, पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता संघरत्न सोनसळे, उपअभियंता प्रकाश कांबळे आदींची उपस्थिती होती.

## सलग दुसऱ्या दिवशी अर्धापूरात अवकाळी पाऊस

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** तालुक्यात सलग दुसऱ्या दिवशी अवकाळी पावसाने हजेरी लावली. शुक्रवार, दि. ३ एप्रिल रोजी रात्री ९ वाजेच्या सुमारास तालुक्यात वादळी वारा व विजेच्या कडकटासह जोरदार पाऊस झाल्यामुळे वीज पुरवठा खंडित झाला होता.

हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार अर्धापूर तालुक्यात सलग दोन दिवस अवकाळी पावसाने हजेरी



लावली. या पावसामुळे शेतकऱ्यांची तारांबळ उडाली. शेतकऱ्यांनी शिजवून ठेवलेली हळद वाळू घातली होती, या पावसाने तिचे नुकसान झाले आहे. यासह शेतातील हळद, गहू, हरभरा, आंबा, पपई, टरबूज, खरबूज पिकांसह फळबागाचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. वादळी वारा व पावसामुळे तालुक्यातील अनेक गावांतील वीज पुरवठा खंडित झाला होता.


## पालखी सोहळ्यावर मधमाश्यांचा हल्ला, ६५ जण जखमी

**पुणे (प्रतिनिधी)–** राजगड तालुक्यातील विहीर गावात अखंड हरिनाम सप्ताहानिमित्त आयोजित पालखी सोहळ्यावर मधमाश्यांनी हल्ला केला. मधमाश्यांनी डंख मारल्यामुळे पालखी सोहळ्यात सहभागी झालेल्यांपैकी ६५ जण जखमी झाले. जखमींवर उपचार सुरू आहेत.

सर्व जखमींवर राजगडमधील वेल्हे येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पालखी सोहळ्यादरम्यान काही जणांनी फटाके वाजवले. या फटाक्यांमुळे परिसरात असलेल्या मधमाश्या अस्वस्थ झाल्या आणि त्यांनी डंख मारल्याचा प्राथमिक अंदाज स्थानिकांनी व्यक्त केला आहे. आतापर्यंत हाती आलेल्या माहितीनुसार २३ महिला, ३० पुरुष आणि १२ लहान मुलांसह एकूण ६५ पेक्षा जास्त नागरिकांना मधमाश्यांनी डंख मारला.










जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# मराठवाड्यावर पुन्हा अन्याय आणि लोकप्रतिनिधींची चिरनिद्रा ?

मराठवाडा आणि दुष्काळ हे जणू एकमेकांचे पर्यायवाची शब्द बनले आहेत. वर्षानुवर्षे पाण्याच्या टंचाईशी दोन हात करताना येथील शेतकरी, सामान्य नागरिक आणि संपूर्ण अर्थव्यवस्था अक्षरशः थकून गेली आहे. अशा परिस्थितीत जलसंपदा विभागाकडून घेतले जाणारे अलीकडील निर्णय या जखमेवर फुंकर घालण्याऐवजी मीठ चोळणारे ठरत असल्याची भावना अधिक तीव्र होत आहे. उपविभाग बंद करणे आणि कार्यालयांचे स्थलांतर करणे या प्रस्तावांमुळे हा प्रश्न आता केवळ प्रशासकीय राहिलेला नाही, तर मराठवाड्याच्या अस्तित्त्वाशी निगडित बनला आहे. दशकानुदशके मराठवाड्याने आश्वासनांची वचने ऐकली, योजनांची घोषणा पाहिली; मात्र प्रत्यक्षात सिंचनाचा विस्तार झाला नाही. निवडणुकांच्या काळात आश्वासनांचे पाऊस पाडणारे उमेदवार निवडून येतात. पाच वर्षांसाठी अदृश्य होतात आणि पुन्हा उगवतात ते पुढच्या निवडणुकीच्या वेळीच. ह्या भूछत्रांचा कोणता उपयोग जनतेला होतो! सध्याच्या परिस्थितीमध्ये पावसाच्या लहरी स्वभावावर अवलंबून असलेली शेती आजही मोठ्या प्रमाणात असुरक्षित आहे. सिंचन अनुशेष तब्बल ४.८२ लाख हेक्टरपर्यंत पोहोचल्याचे चित्र चिंताजनक आहे. याचा अर्थ लाखो हेक्टर जमीन अजूनही पाण्याच्या प्रतीक्षेत आहे. या वास्तवाकडे डोळेझाक करून 'प्रकल्प पूर्ण झाले' असे सांगणे म्हणजे वस्तुस्थितीपासून पळ काढण्यासारखेच आहे. याच पार्श्वभूमीवर जलसंपदा विभागाने मराठवाड्यातील तब्बल २२ उपविभाग बंद करण्याचा प्रस्ताव पुढे आणला आहे. 'काम उरले नाही' हा दिला जाणारा युक्तिवाद वास्तवाला धरून नाही. उलट आजही अनेक प्रकल्प अपूर्ण आहेत, कालव्यांची दुरवस्था आहे, पाण्याचे योग्य नियोजन होत नाही आणि शेतकऱ्यांच्या तक्रारींचे निराकरण होत नाही किंवा झालेच तर ते विलंबाने होते. अशा वेळी या उपविभागांची गरज अधिक भासते, कमी नाही. हे उपविभाग म्हणजे केवळ कार्यालयीन रचना नसून शेतकऱ्यांच्या समस्यांशी थेट जोडलेली जीवनरेखा आहे. तीच जर खंडित झाली, तर प्रशासन आणि शेतकरी यांच्यातील संवादच तुटण्याची भीती आहे. जालना जिल्ह्याचे उदाहरण यासाठी पुरेसे बोलके आहे. येथे अजूनही मोठ्या प्रमाणात सिंचन अनुशेष असताना लघू पाटबंधारे उपविभाग आणि सर्वेक्षण विभाग बंद करण्याचा प्रस्ताव आहे. गोदाकाठच्या काही भागांव्यतिरिक्त संपूर्ण जिल्हा दुष्काळाच्या छायेत असताना ही पावले उचलली जात आहेत. प्रश्न असा निर्माण होतो की, विकासाच्या नावाखाली आपण प्रत्यक्षात मागे चाललो आहोत का? याहून गंभीर बाब म्हणजे नांदेड आणि धाराशिव येथील कार्यकारी अभियंता कार्यालयांसह काही उपविभाग नाशिकला स्थलांतरित करण्याची तयारी. प्रशासनाचे केंद्रीकरण हे कार्यक्षमतेसाठी उपयुक्त ठरते, हा युक्तिवाद काही प्रमाणात ग्राह्य धरला तरी स्थानिक गरजांकडे दुर्लक्ष करून घेतलेले असे निर्णय उलट परिणाम करू शकतात. मराठवाड्यातील पाण्याच्या समस्या समजून घेण्यासाठी स्थानिक पातळीवरील उपस्थिती अत्यावश्यक असते. कार्यालये दूर हलवली गेल्यास निर्णयप्रक्रिया अधिक विलंबित होईल आणि तक्रार निवारण यंत्रणा कमकुवत होण्याची शक्यता आहे. नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून मराठवाड्याला दिलासा मिळण्याच्या आशा व्यक्त केल्या जात आहेत. कोकणातील अतिरिक्त पाणी या भागात आणण्याचा विचार नक्कीच स्वागतार्ह आहे. मात्र, या प्रकल्पाचे प्रशासन नाशिककडे केंद्रित केल्यास स्थानिक भागाची भूमिका दुय्यम ठरण्याचा धोका आहे. ज्यांना या प्रकल्पाचा सर्वाधिक फायदा होणार आहे, त्यांच्याच सहभागाशिवाय निर्णय घेतले जाणे हे योग्य ठरणार नाही. या सगळ्या प्रक्रियेत सर्वाधिक त्रास सहन करावा लागतो तो शेतकऱ्यांना. पाण्याअभावी शेती कोलमडते, उत्पादन घटते, कर्जाचा बोजा वाढतो आणि शेवटी हतबलता टोकाला पोहोचते. आत्महत्यांसारख्या गंभीर घटना ही याच व्यवस्थेतील त्रुटींचे परिणाम आहेत. अशा परिस्थितीत प्रशासनाने अधिक संवेदनशीलतेने आणि दूरदृष्टीने निर्णय घेणे अपेक्षित असते. मराठवाड्याचा प्रश्न हा केवळ पाण्याचा नाही, तर विकासाचा, न्यायाचा आणि समतोल धोरणांचा आहे. या भागाला दिलासा देण्यासाठी केवळ घोषणा पुरेशा नाहीत, तर ठोस आणि स्थानिक वास्तवाशी सुसंगत उपाययोजना आवश्यक आहेत. उपविभाग बंद करण्याऐवजी त्यांना अधिक सक्षम करणे, प्रलंबित प्रकल्पांना गती देणे, जलसंधारणावर भर देणे आणि स्थानिक सहभाग वाढवणे ही काळाची गरज आहे. आज गरज आहे ती निर्णयांचा पुनर्विचार करण्याची. अन्यथा, आधीच दुष्काळाच्या छायेत जगणाऱ्या मराठवाड्याला आणखी एका संकटाला सामोरे जावे लागेल. लोकप्रतिनिधी यांनी स्वतः नावापुरताच न राहता खऱ्या अर्थाने लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी शासनावर दबाव आणावा व प्रशासनाने तातडीने योग्य पावले उचलली, तरच 'सुजलाम् सुफलाम् मराठवाडा' ही कल्पना वास्तवात उतरेल. नाहीतर आश्वासनांचे ओझे आणि दुष्काळाचे वास्तव यामध्ये अडकलेला हा प्रदेश पुढेही संघर्ष करत राहील.

# भीमाबाई होळकर : स्वाभिमान, शौर्य आणि स्त्रीशक्तीचे तेजस्वी प्रतीक

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास हा केवळ पुरुष योद्ध्यांच्या पराक्रमाने घडलेला नाही, तर अनेक धाडसी आणि जिद्दी स्त्रियांनीही आपल्या अदम्य साहसाने त्यात मोलाची भर घातली आहे. अशाच पराक्रमी आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांपैकी एक म्हणजे भीमाबाई होळकर. त्याची शौर्यगाथा आजही प्रेरणा देणारी आहे, परंतु दुर्दैवाने त्यांना इतिहासात अपेक्षित तेवढे स्थान मिळाले नाही. त्यामुळे त्यांच्या जीवनकार्याची ओळख नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे अत्यंत आवश्यक वाटली आणि आजच्या या यशोगाथेच्या माध्यमातून त्यांच्या कार्याला उजाळा देण्याचा प्रयत्न केला आहे.

भीमाबाई होळकर या मराठा साम्राज्यातील प्रतिष्ठित आणि पराक्रमी होळकर घराण्यात जन्मलेल्या होत्या. त्यांचे जन्म साल १७९५. त्या यशवंतराव व कृष्णाबाई होळकर यांच्या कन्या आणि नात्याने त्या अहिल्यादेवींच्या नात. होळकर घराणे हे मराठा साम्राज्यातील एक बलाढ्य आणि प्रभावशाली घराणे म्हणून ओळखले जाते. त्यामुळे लहानपणापासूनच भीमाबाईंवर शौर्य, नेतृत्व आणि स्वाभिमानाचे संस्कार झाले. त्यांच्या बालपणातच त्यांना घोडेस्वारी, तलवारबाजी, युद्धनीती आणि प्रशासन यांचे प्रशिक्षण देण्यात आले. त्यामुळे त्यांची जडणघडण एका सक्षम योद्ध्या आणि कुशल नेतृत्वकर्ती म्हणून झाली.

भीमाबाईंच्या आयुष्यात अनेक वैयक्तिक संकटे आली. यशवंतराव यांचे सेवादार असलेले त्यांच्या सेनेचे प्रमुख गोविंदराव यांच्या सोबत १८०९ साली भीमाबाईंचा विवाह झाला. लग्नानंतर १८११ साली यशवंतराव यांचे निधन झाले. यावेळी त्यांचे भाऊ मल्हारराव दुसरे हे वयाने खूप लहान होते त्यामुळे आपल्या पित्याला मुखाग्नी देण्याचे धाडस भीमाबाईंनी केले. यातून त्यांच्या क्रांतिकारी दृष्टीचे पैलू लक्षात येतात. यशवंतराव यांच्या निधनानंतर काही महिन्यातच गोविंदराव यांचे निधन झाले. अल्पवयातच त्यांना वैधव्य प्राप्त झाले. या दु:खद घटनांनी त्यांच्या जीवनात मोठी पोकळी निर्माण झाली. त्या माहेरी परतल्या. मात्र, त्यांनी या संकटांना शरण न जाता त्यातूनच स्वतःला अधिक मजबूत केले. त्यांच्या मनात देशप्रेम आणि स्वाभिमानाची भावना अधिक दृढ झाली. त्यांनी स्वतःच्या वैयक्तिक दु:खापेक्षा मातृभूमीचे रक्षण अधिक महत्त्वाचे मानले.






१८ व्या शतकाच्या अखेरीस आणि १९ व्या शतकाच्या सुरुवातीस भारतात ब्रिटिश सत्ता विस्तारत होती. मराठा साम्राज्य आणि इंग्रज यांच्यात सतत संघर्ष सुरू होता. १८१७-१८ या काळात तिसरे आंग्ल-मराठा युद्ध झाले, ज्यामुळे मराठा साम्राज्य कमकुवत झाले. अनेक राजे इंग्रजांशी तह करून आपल्या सत्तेचे रक्षण करण्याचा प्रयत्न करत होते. परंतु भीमाबाई होळकर यांनी हा मार्ग स्वीकारला नाही. त्यांनी इंग्रजांविरुद्ध लढण्याचा निर्धार केला. आणि १८१७ साली झालेली महिद-पूरची लढाई ही त्यांच्या जीवनातील एक महत्त्वाची घटना ठरली. या लढाईत त्यांनी सुमारे २,५०० घोडदळाचे नेतृत्व केले. त्यांच्या सैन्याने तलवार आणि भाल्यांच्या साहाय्याने ब्रिटिश सैन्याशी जोरदार संघर्ष केला. त्यांच्या नेतृत्वाखालील सैनिकांनी शौर्य आणि धैर्याचे उत्कृष्ट उदाहरण सादर केले. या लढाईदरम्यान त्यांनी गनिमी काव्याचा वापर करून ब्रिटिश सैन्याला अडचणीत टाकले. काही काळासाठी इंग्रज सैन्य पराभवाच्या उंबरठ्यावर होते.

२१ डिसेंबर १८१७ रोजी झालेल्या या संघर्षात होळकर सैन्याने जोरदार प्रतिकार केला. रोशन बेग यांच्या नेतृत्वाखालील तोफखान्याने इंग्रजांवर प्रखर हल्ला चढवला. ६३ तोफांच्या रांगेतून होणाऱ्या माऱ्यामुळे ब्रिटिश सैन्य गोंधळले. परंतु दुर्दैवाने, होळकर सैन्यातील काही लोकांनी विश्वास-घात केला. गफूर खान या सेनाधिकाऱ्याने आपल्या सैन्यासह रणांगण सोडले. या गद्दारीमुळे युद्धाचे पारडे अचानक फिरले आणि होळकर सैन्याचा पराभव झाला. या पराभवानंतर ६ जानेवारी १८१८ रोजी मंदसौरचा तह करण्यात आला. या तह-ानुसार होळकर साम्राज्याचा मोठा भूभाग ब्रिटिशांच्या ताब्यात गेला. खानदेश आणि सातपुडा

परिसरातील प्रदेश इंग्रजांकडे सुपूर्द करण्यात आले. हा पराभव केवळ राजकीय नव्हता, तर मराठा साम्राज्याच्या अस्तित्वासाठीही मोठा धक्का होता.या सर्व घडामोडींनंतरही भीमाबाई होळकर यांनी हार मानली नाही. त्यांनी इंग्रजांविरुद्धचा संघर्ष सुरूच ठेवला. त्यांनी गनिमी युद्धपद्धतीचा वापर करून ब्रिटिशांना सतत त्रास दिला. त्यांच्या धाडसी हल्ल्यांमुळे इंग्रजांना कायम सतर्क राहावे लागत होते. त्यांनी शरणागती पत्करण्याऐवजी लढा सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला, जो त्यांच्या धैर्याचा आणि स्वाभिमानाचा उत्तम नमुना आहे.

भीमाबाई होळकर यांच्या व्यक्तिमत्त्वात अनेक उल्लेखनीय गुण होते. त्यांच्यात अद्वितीय धैर्य, दृढनिश्चय आणि नेतृत्वगुण होते. संकटाच्या प्रसंगीही त्या कधीही डगमगल्या नाहीत. त्यांनी आपल्या सैनिकांना प्रेरित केले आणि त्यांच्यात लढण्याची जिद्द निर्माण केली. त्यांच्या निर्णयक्षमता आणि युद्धनीतीमुळे त्या एक सक्षम सेनानी म्हणून ओळखल्या गेल्या.इतिहासकारांच्या मते, भीमाबाई होळकर यांच्या शौर्याने पुढील पिढ्यांवर खोल परिणाम केला. त्यांच्या संघर्षातून अनेकांनी प्रेरणा घेतली. विशेषतः, भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रीशक्तीचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या राणी लक्ष्मीबाई यांच्या लढ्यातही या प्रेरणेचा अंश दिसून येतो. त्यामुळे भीमाबाई होळकर या भारतीय स्त्रियांच्या धैर्याचे आणि स्वाभिमानाचे प्रतीक म्हणून ओळखल्या जातात.

भीमाबाई होळकर यांना अखेरीस ब्रिटिशांनी अटक केली आणि त्यांना आयुष्याच्या शेवटपर्यंत कैदेत ठेवण्यात आले. त्यांच्या जीवनाचा शेवट जरी दु:खद झाला असला तरी त्यांच्या शौर्यगाथा अमर आहेत. त्यांनी आपल्या जीवनातून एक महत्त्वाचा संदेश दिलाकी परिस्थिती कितीही कठीण असली तरी स्वाभिमान आणि धैर्य सोडू नये. आजच्या काळात, भीमाबाई होळकर यांचे कार्य आणि त्याग यांची आठवण करून देणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांच्या जी-वनातून आपल्याला संघर्ष, जिद्द आणि देशप्रेम यांचे धडे मिळतात. समाजातील प्रत्येकाने त्यांच्या आदर्शातून प्रेरणा घेऊन आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवली पाहिजे. अखेर, भीमाबाई होळकर या केवळ एक ऐतिहासिक व्यक्ती नव्हत्या, तर त्या एक प्रेरणादायी विचार आहेत. त्यांचे जीवन हे स्त्रीशक्ती, स्वाभिमान आणि राष्ट्रप्रेम यांचे तेजस्वी उदाहरण आहे. त्यांच्या कार्याचा सन्मान करणे म्हणजे आपल्या इतिहासाचा आणि संस्कृतीचा सन्मान करणे होय. अशा कर्तबगार महिलांचा इतिहासाच्या पानावर नामोल्लेख होणे हे गरजेचे आहे.

**-डॉ. दीपाली पांडे देशमुख**
संगीत विभाग
पु. अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय
राणी सावरगाव

# उन्हाळा सुरू झालाय्, सावधान! काळजी घ्या आणि आनंदी राहा!

भारत हा खूप सुंदर देश आहे. यामध्ये विविध ऋतूंचा आनंद घेता येतो. मुख्य ऋतू तीन आणि त्यातला सध्या चालू होतोय उन्हाळा ऋतू, अतिशय गरम ऋतू असतो तरीही बऱ्याच लोकांना आणि लहान मुलांना सर्वात आवडता सुट्टीचा ऋतू म्हणून उन्हाळा आवडतो, कारण या ऋतूत खूप साऱ्या पद्धतीने मुलांना आनंद मिळतो. मुलांना या ऋतूमध्ये शाळेत जाण्याचे टेन्शन नसतं. त्यांना सुट्टी लागलेली असते, मुले परिवारासोबत मौज-मजा करतात, बाहेर फिरायला जातात, मामाच्या गावाकडे जातात. वेगवेगळी थंड पेयं, आईस्क्रीम, फळे खायला मिळतात, लोक उन्हाळ्यात थंड ठिकाणी फिरायला जातात. समुद्र, पहाडी, क्षेत्र अशा ठिकाणी पिकनिक, सहल करायला जातात. मुलांना वेगवेगळे खेळ खेळायला, पोहायला, घरामधील बैठी खेळ खेळायला मिळतात. म्हणून उन्हाळा मुलांच्या आवडीचा ऋतू आहे आणि उन्हाळा या ऋतूचेही खास वेगळेपण असते.

फेब्रुवारी, मार्च, एप्रिल, मे या चार महिन्यांमध्ये हा ऋतू असतो. उन्हाळ्यात सूर्य पृथ्वीच्या जास्त जवळ आलेला असतो म्हणून या ऋतूमध्ये दिवस मोठे व रात्र लहान असतात. उन्हाळ्याला उष्णतेचा ऋतूही म्हटले जाते, यालाच ग्रीष्म ऋतू देखील म्हणतात. ग्रीष्म ऋतूची सुरुवात ही वसंत ऋतुच्या नंतर होते आपण सर्वजण जाणतोच, जाणून आहोतच की, पृथ्वी गोलाकार आहे आणि ती स्वतःभोवती फिरत असताना सूर्याभोवती प्रदक्षिणा घालते.




ज्यावेळी पृथ्वीचा कोणताही एक गोलार्ध सूर्याच्या जवळ पोहोचतो त्यावेळी पृथ्वीच्या त्या भागावर उष्णता निर्माण होते व या कालावधीला त्या ठिकाणाला उन्हाळा असे म्हटले जाते. या ऋतूतील गर्मीमुळे, उन्हामुळे जमिनीवरील पाण्याचे बाष्पीभवन होऊन त्याचे आकाशात ढग बनायला लागतात आणि जून महिन्यामध्ये मग पावसाळ्याला सुरुवात होते. या उन्हाळ्यातही बरीचशी काळजी घ्यावी लागते, सावधान राहावे लागते. यासाठी कडक उन्हात बाहेर जाणे टाळा, अनवाणी पायाने बाहेर जाऊ नका, लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना बाहेर पार्क केलेल्या उन्हातील गाड्यांमध्ये सोडू नका, दुपारच्या वेळेस बाहेरची कामे टाळा, स्त्रियांनी बरीच काळजी घेणे गरजेचे आहे.

कडक उन्हामध्ये स्वयंपाक करणे टाळा, जास्तीत जास्त थंड ठिकाणी राहण्याचा प्रयत्न करा, शरीराला थंडवा देण्यासाठी पंखे, कुलरचा वापर करा, शरीराला थंडवा देण्यासाठी फिक्या रंगाचे कॉटनचे, सुती, सैलसर कपड्यांचा वापर करा. या उन्हाळ्यात जेव्हा शक्य असेल तेव्हा पाणी भरपूर प्रमाणात प्या. जास्तीत-जास्त पाणी प्या, रसदार हंगामी फळे खा, बाहेर जायचेच असेल तर गॉगल, छत्री टोपी, बूट, चप्पल घालूनच घराबाहेर पडा व सोबत पाण्याची बॉटल सतत ठेवावी. सतत काम न करता मध्ये -मध्ये थोडी विश्रांती घ्यावी. जेवणात हलके पचायला जड नसणारे अन्नपदार्थ खावे. फळे, सलाद खावे, दिवसातून कमीत कमी चार-पाच वेळा हात-पाय, तोंड थंड पाण्याने धुवावे, शक्य असेल तर दोन वेळा थंड पाण्याने अंघोळ करावी. स्वच्छतेच्या चांगल्या सवयी लावून घ्याव्यात. साखर, मीठ, चरबीयुक्त पदार्थ जास्त खाणे टाळावेत, योग्य आहार घ्यावा. जास्तीचा आहार घेऊ नये, जास्तीचा चहा, अल्कोहोल युक्त पदार्थ पिणे टाळावे, ही झाली उन्हाळ्यात घ्यावयाची काळजी.

आता पाहू काळजी घेऊनही उष्माघात झाला असेल तर त्याची लक्षणे -१) डोकेदुखी, ताप, उलट्या, जास्त घाम येणे आणि बेशुद्ध पडणे, अशक्तपणा जाणवणे, चक्कर येणे, मळमळ वाटणे, अत्याधिक तहान लागणे, लघवी कमी होणे, जळजळ होणे, वारंवार श्वास लागणे आणि हृदयाचे ठोके वाढणे, भूक न लागणे, अत्याधिक चिडचिड होणे, सुस्ती येणे, मानसिकता स्थिर नसणे, डोळ्यासमोर अंधुकपणा जाणवणे, नाकातून रक्त स्त्रावणे, चिडचिडपणा व बेशुद्ध होणे, शरीरातील स्नायू कमकुवत किंवा पेटके आल्यासारखे वाटणे, त्वचा गरम लाल आणि कोरडी पडणे, त्वचेची आग होणे, डोळे शुष्क पडणे, शरीराचे तापमान ४० ओलपेक्षा अधिक किंवा १०४ ओऋ होणे व यामुळे कोमात जाणे, झटके येणे अशी अनेक उष्माघाताची लक्षणे आहेत, आणि या उष्णघाताच्या लक्षणाकडे दुर्लक्ष करू नका, अशी लक्षणे आढळल्यास प्रथमोपचार म्हणून पुढील काळजी घ्यावी.

ज्यांना उष्माघात झालाय त्यांना ताबडतोब सावलीच्या ठिकाणी झोपवा. संवेदनशील राहून त्या व्यक्तीचे कपडे सैल/ढिले करावे, त्यांना थंड द्रव पातळ पदार्थ प्यायला द्या, शरीराचे तापमान कमी करण्यासाठी डोक्यावर थंड पाण्याच्या पट्ट्या ठेवा, उलटी होत असल्यास त्यांना एका कुशीवर झोपवावे जेणेकरून ते गुदमरून जाणार नाहीत. जास्त थंड हवा मिळण्यासाठी पंखा किंवा कुलरच्या समोर झोपावे, वारंवार थंड पाणी पिण्यास द्यावे, लक्षणे गंभीर असतील तर तत्काळ जवळच्या दवाखान्यात दाखवावे व डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार उपाय उपचार करावे. असा उन्हाळा ऋतू थोडीशी काळजी घेऊन सावधानी बाळगून खूप आनंदाने घालवू शकतो. सर्व कामे होतील तितकी सकाळच्या वेळी पूर्ण करून घेणे, दुपारच्या वेळी आराम करणे, थंडगार टरबूज कापून खाणे, थंडगार लिंबू सरबत घेणे, लस्सी, आईस्क्रीम, आंब्याचा पन्हा, आंब्याचा रस पिणे, दुपारच्या सुट्टीच्या वेळी नवीन नवीन गोष्टी शिकण्यात घालवणे, थोडासा आराम करणे, घरामध्ये सावलीमध्ये बैठी खेळ खेळणे, संध्याकाळी मग मैदानी खेळ क्रिकेट, फुटबॉल, बॅडमिंटन खेळणे अशाप्रकारे हा उन्हाळा काळजीपूर्वक व नियोजनबद्ध घालवला तर कळणारही नाही कसा संपून गेला.

**-श्रीमती एस. बी. सोनवणे**
सहशिक्षिका
जि. प. प्राथमिक शाळा महेबूबनगर
हाणेगाव, ता. देगलूर, जि. नांदेड

# भौतिक सुविधाने सुख मिळाल्याचा केवळ आभास



प्रशस्त, देखणे, टुमदार, सर्व सोयीसुविधांनी युक्त घर आहे; पण त्या घराला घरपणच उरलेले नाही. सोन्यासारखी माणसे आहेत. आई, बाबा, भाऊ, बहीण पत्नी, मूलंबाळ सगळी-सगळी नाती आहेत. पण त्या नात्यात ओलावाच उरला नाही. प्रत्येक नात्यात ओलावा असावा, तो तसाच टिकून राहावा यासाठी कुणी प्रयत्नही करत नाही. प्रत्येकाच्या डोक्यात एकच विचार मला काय गरज आहे...? माझ्याकडे सगळं काही आहे; मला कोणाचीही गरज नाही. पण लक्षात घ्या हा भ्रम आहे.. निव्वळ भ्रम... हे वेळोवेळी सिद्ध झालंय.... कसला पैसा...?... कुणाची धनदौलत...? कुठला मानसन्मान...? कुठली पद, प्रतिष्ठा....? कसली स्थावर-जंगम मालमत्ता...? कशाची प्रसिद्धी...? कुठला बढेजावपणा...? एवढे सगळे मिळाले म्हणजे आयुष्य सुखी आणि समृद्ध झाले असे नाही. किती आणि कुठंपर्यंत या सर्वांचा उपयोग...? या सर्वांपेक्षाही आयुष्यात आणखीन काही महत्त्वाचे असते...? भौतिक सुखाने सुख मिळाल्याचा केवळ आभास निर्माण होतो. प्रत्यक्ष समाधान मिळत नाही.

सुख, समाधान, आनंदासाठी आपल्या माणसांचे प्रेम, माया, ममता, आपुलकी, वात्सल्य आणि त्यांचा आनंददायी सहव-ासच आवश्यक असतो. पैसा, धनदौलत, प्रतिष्ठा मानसन्मान तुम्हाला समजून घेऊ शकत नाही. तुमच्या डोक्यावरून मायेने हात फिरवू शकत नाही. तुम्हाला कुरवाळू शकत नाही. तुम्हाला कुशीत घेऊ शकत नाही. तुमचे दुःख समजून घेऊ शकत नाही. तुमच्या वेदना त्यांना कळत नाहीत. त्यासाठी आपली माणसेच लागतात.

अभिमान वाटावा असं एक तरी नातं हवं.... ज्याच्या खांद्यावर डोकं ठेवलं की अक्षरशः बांध फ ुटावा.... कुणाजवळ तरी हंबरडा फोडून रडता यावं... कुणाला तरी सगळं सुख-दुःख सांगता यावं....आयुष्यात कोणीतरी हवं त्याचं सगळं ऐकून घ्यावं आणि ज्याला आपलं सगळं काही सांगावं... कोणीतरी हवं ज्याला आपलं असणं हवंहवंस वाटावं. ज्याला आपलं रुसणं नकोसं वाटावं. आपण आनंदातच राहावं. आपल्या आयुष्यात दुःख येऊच नये आणि आलेल्या दुःखाला सामोरे जाण्याचे धैर्य त्यांनी आपल्याला द्यावं. आपल्या असण्याचा ज्याच्यावर फरक पडावा. आपल्या नसण्याने ज्याला विरह वाटावा. अशी हक्काची जिवाभावाची माणसं आपलं दुःख समजू शकतात. आपल्याला समजू शकतात. या सगळ्या समजून घेण्यामुळेच आपण सुखी,समाधानी, आनंदी राहू शकतो.

कशासाठी जगतो आहोत आम्ही ? आणि कुणासाठी जगतो आहोत आम्ही ? या दोन प्रश्नांची उत्तरे अगदी मध्यरात्री जरी कोणी विचारली तरी ती सांगता यावीत.. या प्रश्नांची उत्तरे सापडली नाहीत ; तर मात्र माणूस नाईलाजाने आत्महत्येकडे वळतो. आजच्या धावपळीच्या एकविसाव्या शतकात माणसाचे जीवन कसे झाले आहे. यावरील एक सुंदर कविता आठवते. कुणाची आहे माहित नाही पण छान आहे.

आऊटडेटेड झाले आयुष्य सारं
स्वप्नही डाऊनलोड होत नाही
संवेदनांना व्हायरस लागलाय
दुःख सेंड करता येत नाही
जुने पावसाळे उडून गेलेत
डिलीट झालेल्या फाईल्स सारखे
आणि घर आता शांत असतं
रेंज नसलेल्या मोबाईल सारखे
हँग झालेल्या पीसी सारखी
मातीची स्थिती वाईट
जाती माती जोडणारी
कुठेच नाही वेबसाईट
एकविसाव्या शतकातील
पीढी भलतीच क्युट
कॉन्टॅक्ट लिस्ट वाढत गेली
संवाद झाले म्युट
कम्प्युटर च्या चीप सारखा
माणूस मनानं खुजा झालाय
अन मदर नावाचा बोर्ड त्याच्या
आयुष्यातून वजा झालाय
फ्लॉपी डिस्क ड्राइव्ह मध्ये
आता संस्कारांनाच जागा नाही
फाटली मने सांधणारा
इंटरनेटवर धागा नाही
विज्ञानाच्या युगातील
केवढी मोठी चूक
रक्ताच्या नात्यांनाही लागते
व्हाट्सअप आणि फेसबुक

एका घरात राहत आहोत पण संवाद विसरत चाललो आहोत. हे केवढे दुर्भाग्य आहे. कुटुंबातील माणसे आहेत ; पण कोणत्या न कोणत्या कारणामुळे एकमेकापासून दुरावलेली आहेत. नातेवाईक भरपूर आहेत तरीदेखील अभिमान वाटावा असे एकही नातं नाही. प्रत्येक जण आपापल्या तोऱ्यात, गर्वात, अहंकारात मीपणात काठोकाठ बुडाला आहे. ढीगभर मित्र आहेत पण मन मोकळे करावे असा एकही नाही. अंतःकरण मोकळे करावे. हृदयात साठलेल्या सगळ्या वेदना दाखवाव्यात. काळजाला टोचणाऱ्या गोष्टी सांगाव्यात. मनाच्या वेदनादायी जखमांवर फ ुंकर घालावी. खदखदून हसावे. रडून एकदाच मोकळे व्हावे. असा एकही कुटुंबातील सदस्य, एकही नातेवाईक आणि एकही मित्र नसणे. म्हणजे आपल्या जीवनाचं सर्वात मोठे अपयश आहे.

सांगु कशी कुणाला
कळ आतल्या जीवाची
चिरदाह वेदनेचा
मज शाप हाच आहे

**-मयूर मधुकरराव जोशी**
विठ्ठल रुक्मिणी नगर, जिंतूर.
जि. परभणी.
मो. ९७६७७३३५६०
७९७२३४४१२८

# 'स्वारातीम' विद्यापीठामध्ये पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ खो-खो (मुले) स्पर्धेचे उद्घाटन

**नांदेड (प्रतिनिधी)** –स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाच्या वतीने पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ खो-खो (मुले) स्पर्धेचे उद्घाटन क्रीडा मैदानावर नुकतेच पार पडले. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते हे उद्घाटन क्रीडा मशालीद्वारे ज्योत पेटवून आणि रंगबेरंगी फुगे हवेत सोडून करण्यात आले. यावेळी त्यांच्यासमवेत भारतीय खो-खो संघाची कर्णधार प्रतीक वाईकर, आंतरराष्ट्रीय खो खो खेळाडू हर्षल हातानकर, ऑल इंडिया युनिव्हर्सिटीचे निरीक्षक डॉ.जगदीश गस्ती, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. प्रशांत पेशकार, डॉ.सूर्यकांत जोगदंड, डॉ. सुरेखा भोसले, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, क्रीडा संचालक डॉ. भास्कर माने, अधिसभा सदस्य डॉ. महेश बेंबडे, रासेयो संचालक डॉ. मारुती गायकवाड यांची विशेष उपस्थिती होती. दि. २ ते ६ एप्रिल २०२६ या दरम्यान चालणाऱ्या या खो-खो स्पर्धेसाठी पाच राज्यांतून जवळपास ७४ टीमने सहभाग




नोंदवला आहे.

पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत महाराष्ट्र, गोवा, गुजरात, मध्य प्रदेश व राजस्थान असे पाच राज्यांतील एकूण ७४ संघ सहभागी झाले आहेत. स्पर्धेसाठी एकूण ४ क्रीडांगण तयार करण्यात आले आहेत. स्पर्धा ह्या दिवस व प्रकाश झोतात खेळल्या जाणार आहेत. या स्पर्धा सकाळी ७ ते ११ आणि संध्याकाळी ७ ते ११ दरम्यान खेळवल्या जाणार आहेत. स्पर्धेसाठी विविध समित्या तयार करण्यात आल्या आहेत.

या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी स्पर्धा समन्वयक डॉ. पवन पाटील, डॉ. महेश वाकडकर, डॉ. मीनानाथ गोमसाळ, डॉ. दिलीप माने, डॉ. माधव कदम, डॉ. बालाजी जाधव, डॉ. अनिल इंगोले, डॉ. भीम केंगले, डॉ. शिवानंद पाटील, डॉ. अभिजीत सरनाईक, डॉ. अशोक चाटसे, डॉ. तातेराव केंद्रे, डॉ. गणेश मांगिरे यांच्यासह विद्यापीठातील कर्मचारी संजयसिंह ठाकूर, शिवाजीराव हंबर्डे, रामा किरकन, सुनील लुटे, रतनसिंघ पुजारी, परमजीतसिंघ सिंधू, प्रकाश इबितवार ई. परिश्रम घेत आहेत.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ येथे आयोजित पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ खो-खो (मुले) स्पर्धा उत्साहात पार पडत असून विविध राज्यांतील विद्यापीठांच्या संघांनी दमदार कामगिरी करत सामने गाजवले.

स्पर्धेतील पहिल्या सामन्यात राजा शंकर शहा विद्यापीठ, छिंदवाडा संघाने राणी अवंतीबाई विद्यापीठ, सागर संघावर एक डाव व ५ गुणांनी विजय मिळवला. दुसऱ्या सामन्यात श्री गोविंद गुरु विद्यापीठाने श्री कुशलदास विद्यापीठ, हनुमानगड संघावर मात केली.

तिसऱ्या सामन्यात जय नारायण व्यास विद्यापीठ, जोधपूर विरुद्ध पंडित दीनदयाल उपाध्याय शेखावाटी विद्यापीठ यांच्यात झालेल्या चुरशीच्या लढतीत शेखावाटी विद्यापीठाने अवघ्या १ गुणाने विजय मिळवला. चौथ्या सामन्यात राजऋषी भर्तृहरी मत्स्य विद्यापीठ, अलवर संघाने कोटा विद्यापीठावर १ गुण व ८.१० मिनिटे राखून विजय संपादन केला.

# बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी विविध योजना, अर्ज करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)** –महाराष्ट्र शासनाच्या इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत बांधकाम व इतर बांधकाम क्षेत्रातील कामगारांच्या कल्याणासाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. सदर योजनांचा लाभ घेण्यासाठी कामगारांची नोंदणी, नोंदणीचे नुतनीकरण तसेच विविध योजनांसाठी अर्ज प्रक्रिया MHBOCW.IN या अधिकृत संकेतस्थळावरून करण्यात येते. या संकेतस्थळावर खालील सेवा पूर्णपणे विनामूल्य उपलब्ध आहेत.परंतु असे निदर्शनास आले आहे की, काही मध्यस्थ/एजंट/दलाल बांधकाम कामगारांकडून अर्ज भरून देण्याच्या नावाखाली अनधिकृत शुल्क आकारत आहेत. तसेच काही प्रकरणांमध्ये कामगारांना मिळणाऱ्या लाभाच्या रकमेपैकी ठराविक टक्के रक्कम घेत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. ही बाब कामगारांची फसवणूक व आर्थिक शोषण करणारी असून ती गंभीर स्वरूपाची आहे.

MHBOCW पोर्टलवरील सर्व सेवा पूर्णपणे मोफत आहेत. कोणत्याही एजंट/मध्यस्थ /दलाल यांना पैसे देऊ नयेत. कामगारांनी स्वतः किंवा अधिकृत सेवा केंद्र (CSC/सेतू केंद्र) यांच्या माध्यमातूनच अर्ज करावा. लाभ मिळवून देण्याच्या नावाखाली पैसे मागणाऱ्या व्यक्तीवर विश्वास ठेवू नये. अशा व्यक्तींबाबतची माहिती तत्काळ कामगार विभागाच्या कार्यालयाला कळवावी. सर्व बांधकाम कामगारांनी स्वतःची आधार माहिती, बँक खाते तपशील व OTP इत्यादी गोपनीय माहिती कोणत्याही अनधिकृत व्यक्तीला देऊ नये.

शासनाच्या योजनांबाबत चुकीची माहिती देऊन कामगारांची दिशाभूल करू नये. कामगारांची फसवणूक, आर्थिक शोषण किंवा बनावट अर्ज केल्याचे आढळल्यास संबंधित व्यक्तीविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे कळविण्यात आले आहे.

# नायगावात कृषी सहायकाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह; शेतकऱ्यांत संताप




**नायगाव बाजार (प्रतिनिधी)**– तालुक्यातील कृषी विभागातील एका कृषी सहायकाच्या निष्क्रिय व हलगर्जी कामकाजामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. शासकीय कृषी योजनांची माहिती वेळेत व स्पष्टपणे दिली जात नसल्याने अनेक पात्र शेतकरी लाभापासून वंचित राहत असल्याचा आरोप होत आहे.

पीक विमा, ठिबक व तुषार सिंचन, बी-बियाणे अनुदान तसेच कृषी यंत्रसामग्री योजनांसाठी अर्ज करूनही योग्य मार्गदर्शन मिळत नसल्याची तक्रार आहे. कागदपत्रांमध्ये त्रुटी काढून अर्ज प्रलंबित ठेवले जात असून, शेतकऱ्यांना वारंवार कार्यालयाच्या चकरा माराव्या लागत आहेत. परिणामी, वेळ आणि आर्थिक नुकसान सहन करावे लागत असल्याची खंत व्यक्त करण्यात आली.

या पार्श्वभूमीवर संबंधित कृषी सहायकाची तत्काळ बदली करून विभागीय चौकशी करावी, अशी मागणी जोर धरत आहे. प्रशासनाने तातडीने दखल न घेतल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा शेतकऱ्यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

# बोरगाव थडी येथे अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता



**शकंरनगर (प्रतिनिधी)**– बिलोली तालुक्यातील बोरगाव थडी येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये श्रीमद् भागवत कथा, ज्ञानेश्वरी पारायण तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहाची नुकतीच सांगता झाली.

सप्ताहादरम्यान दररोज नियमितपणे ज्ञानेश्वरी पारायण, काकडा भजन, गाथा, कीर्तन, हरिपाठ तसेच विविध आध्यात्मिक वाचन-प्रवचन कार्यक्रम पार पडले. त्यामुळे संपूर्ण गावात सात दिवस भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

दि. २ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता गुरुवर्य ह.भ.प. चंद्रशेखर महाराज देगलूरकर यांच्या मधुर वाणीतून काल्याचे कीर्तन संपन्न झाले आणि सप्ताहाची सांगता झाली. त्यांच्या प्रभावी कीर्तनाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले.

या सप्ताहाचा लाभ पंचक्रोशीतील मोठ्या संख्येने भाविकांनी घेतला. यावेळी ग्रामस्थांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास बोरगाव थडी येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. एकूणच बोरगाव थडी येथील अखंड हरिनाम सप्ताह सात दिवस अत्यंत भक्तिमय, शांततेत आणि उत्साहात पार पडला.

# मोटारसायकल वाहनांसाठी नवीन मालिका सुरू

**नांदेड (प्रतिनिधी)**– परिवहनेत्तर संवर्गातील मोटारसायकल वाहनांसाठी एमएच २६- डीबी ही नवीन मालिका लवकरच सुरु होणार आहे. ज्या अर्जदारांना पसंती क्रमांक घ्यावयाचा आहे त्यांचे आधारकार्ड, पॅनकार्ड, मोबाईल क्रमांक व ईमेलसह अर्ज २ एप्रिल २०२६ रोजी दुपारी २.३० पर्यंत स्वीकारण्यात येणार आहेत.

अर्जासोबत संबंधित पसंती क्रमांकाच्या शुल्काचा धनादेश (डीडी) सुध्दा सादर करावा. विहित केलेल्या दिनांक व वेळेनंतर पसंती क्रमांकासाठी अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत याची नोंद घ्यावी, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी नांदेड यांनी केले आहे.

ज्या पसंती क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास २ एप्रिल रोजी दुपारी ४ वाजता दूरध्वनीद्वारे संबंधित अर्जदारास कळविण्यात येईल. तरी सर्वानी याबाबतची नोंद घ्यावी, असे प्रादेशिक परिवहन अधिकारी नांदेड यांनी कळविले आहे.

# हनुमान जयंतीनिमित्त माजी आ. रोहिदास चव्हाण यांच्या हस्ते हनुमान चालीसाचे वाटप

**लोहा (प्रतिनिधी)** –जुना लोहा शहरातील मारोती मंदिर येथे हनुमान जन्मोत्सवानिमित्त शिवसेना (उबाठा) चे ज्येष्ठ नेते लातूर जिल्हा संपर्कप्रमुख, माजी आमदार रोहिदास चव्हाण व सूर्यकांत गुरू सनपूरकर यांच्या हस्ते हनुमान भक्तांना हनुमान चालीसाचे वाटप करण्यात आले.

प्रथमतः खरेदी विक्री संघाचे उपसभापती श्यामअण्णा पवार यांच्या हस्ते व माजी आ. रोहिदास चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत हनुमंतरायाचा अभिषेक करण्यात आला. तत्पूर्वी हनुमान गाथेचे वाचन सकाळी ५.३० ते ६.४५ या वेळेत सूर्यकांत गुरु सनपूरकर यांनी केले. श्रींच्या आरतीनंतर गुलाल उधळण्यात आला. यावेळी श्रवण व महाप्रसाद घेण्यासाठी गावातील उपस्थित सर्व भाविक भक्तांना मोहन पाटील पवार यांच्या वतीने आयोजित हनुमान चालीसाचे वाटप हस्ते करण्यात आले.





हनुमान जन्मोत्सवनिमित्त हनुमान चालीसा वाटप कार्यक्रमास माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, नगरसेवक गोपाळ सावकार कवठेकर, हरिभाऊ चव्हाण, नामदेव पाटील पवार, बालाजी अंकुलवार, शिक्षक नेते विठूभाऊ चव्हाण, बी. वाय. चव्हाण, काशिनाथ शिरशीकर, श्यामअण्णा पवार, किसन काळे, अप्पाराव पवार, लक्ष्मण कांजले, पत्रकार संजय कहाळेकर, हनुमंत पांचाळ, गजानन दांगटे, बबरू पाटील पवार, गंगाधर पवार, मोहन मुंडे, गोविंद पवार, सूर्यकांत चव्हाण, दीपक चव्हाण, ऋतिक पवार आदी हनुमान भक्त उपस्थित होते.

# नांदेड रेल्वे विभागाची तिकीट तपासणी महसुलामध्ये आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी

**नांदेड (प्रतिनिधी)** –दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये तिकीट तपासणी महसुलामध्ये उल्लेखनीय टप्पा गाठत आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी नोंदवली आहे.

आर्थिक वर्ष २०२५२६ दरम्यान, रेल्वे गाड्या व स्थानकांवर राबविण्यात आलेल्या विशेष तिकीट तपासणी मोहिमांमधून विभागाने एकूण १४.९५ कोटी महसूल प्राप्त केला आहे. ही रक्कम मुख्यालयाने दिलेल्या १४.८० कोटीच्या उद्दिष्टापेक्षा जास्त असून, आर्थिक वर्ष संपण्यास तीन दिवस शिल्लक असताना म्हणजेच २८ मार्च रोजीच हे उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले. यावरून विभागातील तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांची मेहनत, तत्परता आणि समर्पण स्पष्ट होते.

सध्याची कामगिरी ही आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये नोंदवलेल्या १२.५९ कोटी या मागील सर्वोत्तम महसुलापेक्षाही अधिक असून, तिकीट तपासणी कार्यक्षमता आणि महसूल प्राप्तीत लक्षणीय वाढ दर्शविते.

याशिवाय या वर्षात नांदेड विभागाने खालील महत्त्वाचे विक्रमही नोंदवले आहेत. एका दिवसातील सर्वाधिक तिकीट तपासणी महसूल: १०.९० लाख (१७ ऑक्टोबर २०२५), महिन्यातील सर्वोत्तम कामगिरी: १.५५ कोटी (ऑक्टोबर २०२५). ही यशस्वी कामगिरी तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे शक्य झाली असून, अनियमित प्रवास, विनातिकीट प्रवास आदींवर प्रभावी नियंत्रण ठेवून रेल्वे महसुलाचे संरक्षण करण्यात त्यांचा मोठा वाटा आहे.

सुसूत्र नियोजन, विशेष तिकीट तपासणी मोहिमा, सातत्यपूर्ण देखरेख आणि विभागातील तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांचे समर्पण यामुळे हा उल्लेखनीय टप्पा गाठता आला असल्याचे रेल्वे प्रशासनाने सांगितले.

# तेहरा परिवाराचा समाजोपयोगी उपक्रम: सलग ११ वर्षांपासून अविरत 'पाणपोई' सेवा

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहरातील तेहरा टायर स्टेशन रोड येथे स्व. राधाबाई गोपालसिंह तेहरा यांच्या स्मरणार्थ व तेहरा परिवाराच्या वतीने थंड पाणपोई सेवा सुरू करण्यात आली आहे. या पाणपोईचे उद्घाटन महापौर कविता मुळे यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले.

या प्रसंगी तेहरा परिवाराच्या वतीने उपस्थित सर्व अतिथींचा शाल, श्रीफळ आणि चांदीची गणपतीची मूर्ती देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाला उपमहापौर दीपकसिंह रावत, सभापती वीरेंद्रसिंह गाडीवाले, सभागृह नेता ॲड. महेश कनकंदडे, मुन्नासिंह तेहरा, चैतन्यबापू देशमुख, अमितसिंह तेहरा, शिरिषसिंह तेहरा, प्रवीण साले, महेश उर्फ बाळू खोमणे, ॲड. निलेश पावडे, नगरसेवक डिंपल नवाब, नगरसेवक सुमित मुथा, नगरसेवक धिरज यादव, नगरसेवक प्र. अरविंद भारतीया,




नगरसेवक प्र. कुंजिवाले, संतोष मुळे, अतिशसिंह तेहरा, अध्यनसिंह तेहरा, शितल खांडील, गंगाधर कदम, बागड्या यादव, अक्षय अमिलकंठवार व इतर मान्यवर उपस्थित होते.

समाजसेवेचा वारसा जपत तेहरा परिवाराच्या वतीने हा उपक्रम मागील ११ ते १२ वर्षांपासून सातत्याने राबविण्यात येत आहे. उन्हाळ्याच्या तीव्र झळांपासून नागरिकांना दिलासा मिळावा, या हेतूने ही पाणपोई सुरू करण्यात येते.

या उपक्रमांतर्गत उन्हाळ्याच्या दोन महिन्यांमध्ये सरासरी दररोज २०० पाण्याचे कॅन पुरवून सेवा दिली जाते. संपूर्ण उन्हाळाभराचा विचार करता साधारण १२ ते १५ हजार कॅन शुद्ध पाणी नागरिकांना मोफत उपलब्ध करून दिले जाते, असे तेहरा परिवाराच्यावतीने सांगण्यात आले.

# प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र योजनेंतर्गत इच्छुक संस्थांना प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)** –प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र योजनेंतर्गत जिल्ह्यातील ग्रामीण भागात कौशल्य प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यासाठी पात्र प्रशिक्षण भागीदार (Training Partner TP/Training Center TC) संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. इच्छुक व पात्र प्रशिक्षण भागीदार, प्रशिक्षण केंद्र संस्थांनी आपले प्रस्ताव शुक्रवार, दि. १० एप्रिल २०२६ रोजी सायं. ५ वाजेपर्यंत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नांदेड येथे दोन प्रतित सादर करावेत, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त डॉ. रा. म. कोल्हे यांनी केले आहे.

या योजनेअंतर्गत ग्रामीण युवकांना उद्योगाभिमुख कौशल्य प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हा प्रमुख उद्देश आहे.

# लोह्यात गॅस दरवाढीच्या विरोधात वंचित बहुजन आघाडीचे आंदोलन



**लोहा (प्रतिनिधी)**– लोहा शहरात गॅस दरवाढीच्या विरोधात वंचित बहुजन आघाडी तालुका लोहा शाखेतर्फे आंदोलन करण्यात आले.

लोहाचे तहसीलदार यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विविध मागण्यांचे निवेदन वंचित बहुजन आघाडीच्यावतीने देण्यात आले. यावेळी लोहा तहसील कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली व पुढील मागण्या केल्या. गॅस सिलेंडर बुक केल्यानंतर २५ दिवसांनी गॅस मिळत आहे. तो दोन-तीन दिवसात मिळवूने देण्यात यावा, घरगुती गॅस १६.२ किलो होता तो आता १४ ते १२ किलो गॅस भरला जात आहे. पूर्वीप्रमाणे १६.२ किलो गॅस सिलेंडरचे वजन कायम ठेवावे. देशभरात गॅस सिलेंडरच्या तीव्र टंचाईमुळे सर्वसामान्य नागरिकांना गंभीर अडचणींचा सामना करावा लागत आहे. गॅसचा काळा बाजार करणाऱ्यांवर कारवाई करावी, ९३२ रुपयांचा गॅस सिलेंडर काळ्या बाजारात ५००० रुपयांना विकला जात आहे यावर कठोर कारवाई करावी आदी मागण्या करण्यात आल्या .

यावेळी वंचित बहुजन आघाडीचे बी. बी. गायसमुद्रे, व्ही.के. कांबळे, वाय. बी. महाबळे, अनिल गायकवाड, गौतम वाघमारे, शेषराव हंकारे, अनिल ढवळे, के. व्ही. सोनकांबळे, आत्माराम गायकवाड, विनोद महाबळे, चंद्रकांत वाघमारे, नारायण बारूळे आदी उपस्थित होते.

# 'यशवंत'मधील वसतिगृहात वीस दिवसीय योग शिबीर संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)**– श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचालित मुलींच्या वसतिगृहात यशवंत महाविद्यालय आणि यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिकच्या संयुक्त विद्यमाने दि. ६ मार्च ते २५ मार्च दरम्यान २० दिवसीय योग शिबीर उत्साहात पार पडले.

माजी प्र-कुलगुरू प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार ताणतणाव व्यवस्थापन तसेच स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थिनींसाठी या विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

दि. ६ मार्चला शिबिराचे उद्घाटन डॉ. मनीषा जाधव यांच्या आरोग्यविषयक व्याख्यानाने झाले. शिबिरामध्ये विद्यार्थिनींना विविध योगासनांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखवून



मानसिक आणि शारीरिक आरोग्य सुधारण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले.

शिबिरासाठी योग प्रशिक्षक म्हणून प्रा. डॉ. रुद्रावती एस. चव्हाण आणि डॉ. एस. ए. तोष्णीवाल यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी विविध योगासनांच्या माध्यमातून ताण कसा कमी करावा आणि निरोगी जीवनशैली कशी अंगीकारावी याबाबत सविस्तर माहिती व प्रात्यक्षिके सादर केली.

शिबिराची सांगता डॉ. किशोर अतनूरकर यांच्या मार्गदर्शनाने झाली. त्यांनी विद्यार्थिनींमध्ये ताणमुक्त जीवनशैलीबाबत जागरूकता निर्माण करत सकारात्मक विचारसरणी विकसित करण्यावर भर दिला.

शिबिरादरम्यान विद्यार्थिनींनी योगाच्या विविध क्रियांचा नियमित सराव करून ताणमुक्त आणि निरोगी जीवनशैलीचा स्वीकार करण्याचा संकल्प केला. शेवटी विद्यार्थिनींनी प्रतिक्रिया देताना या शिबिराचा मोठ्या प्रमाणात लाभ झाला असून, शारीरिक व मानसिक आरोग्यात सकारात्मक बदल दिसून आल्याचे सांगितले.

कार्यक्रमाला डॉ. कविता केंद्रे, डॉ. नीताराणी जैस्वाल, डॉ. मीरा फड, प्रा. प्रियंका शिशोदिया, डॉ. दीप्ती तोटावार, एल. लंगडापुरे, लता जाधव (किन्हाळकर), तृप्ती पवळे, शकुंतलाबाई शेळगावकर, स्वरा पाटील, श्लोका पाटील, कवळे यांची उपस्थिती लाभली.

योग शिबिराच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे, उपप्राचार्य डॉ. कविता सोनकांबळे, डॉ. हरिश्चंद्र पतंगे, प्रसिद्धी समन्वयक डॉ. अजय गव्हाणे, प्रबंधक संदीप पाटील, अधीक्ष कालिदास बिरादार व गजानन पाटील यांनी सहकार्य केले.

# ॲड. व्यंकटेश पाटनूरकर 'राम सेवा गौरव' पुरस्काराने सन्मानित



**नांदेड (प्रतिनिधी)**– सुप्रसिद्ध विधीतज्ज्ञ तथा रामाश्रय प्रतिष्ठान नांदेडचे अध्यक्ष ॲड. व्यंकटेश पाटनूरकर यांना 'राम सेवा गौरव' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. हा पुरस्कार कलांगण प्रतिष्ठान नांदेड, श्रीराम भक्त मंडळी आणि दैनिक प्रजावाणी नांदेड यांच्या संयुक्त विद्यमानाने प्रतिवर्षी दिला जातो.

रामनवमीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या एका विशेष समारंभात नांदेड महानगरपालिकेचे आयुक्त महेशकुमार डोईफोडे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पहार आणि सन्मान चिन्ह देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला आहे.

सदरील समारंभ डॉ. शंकरराव चव्हाण सभागृह नांदेड येथे संपन्न झाला आहे. याप्रसंगी पत्रकार विजय जोशी, गजानन पिंपरखेडे, डॉ. नितीन जोशी, विद्यमान नगरसेविका शांभवी साले आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच गोदावरी अर्बन को-ऑप. बँकेचे संचालक डॉ. सायन्ना मठमवार, नराशाम प्रा.शाळेचे मुख्याध्यापक राजेश मठमवार यांनी पाटनूरकर यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

## गोल की चौकोनी इंडक्शन?

### डिझाइनमुळे स्वयंपाक अन् वीज बिलात फरक पडतो का? खरेदी करण्यापूर्वी हे जाणून घ्या...

**आजकाल इंडक्शनचा वापर वाढला आहे. देशात सुरू असलेल्या एलपीजी सिलिंडरच्या तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर लोक इंडक्शनवर स्वयंपाक करत आहेत. ज्यांच्या घरी इंडक्शन नाही, ते इंडक्शन खरेदी करण्यासाठी बाजारात जात आहेत. यामुळे विक्रीतही वाढ होत आहे. पण इंडक्शन खरेदी करताना लोकांच्या मनात अनेकदा हा प्रश्न येतो की त्यांच्या घरासाठी कोणता इंडक्शन योग्य असेल. तुम्ही बाजारात इंडक्शनचे दोन डिझाइन पाहिले असतील : गोल आणि चौकोनी. कोणता इंडक्शन चांगले शिजवेल आणि कमी वीज वापरेल याबद्दल तुम्ही गोंधळात असाल, तर आम्ही सांगू इच्छितो की डिझाइनचा तुमच्या वीज बिलावर थेट परिणाम होत नाही. तुम्ही वापरत असलेल्या भांड्यांच्या प्रकारावर अवलंबून असते. चला, दोन्ही डिझाइनबद्दल जाणून घेऊया...**

» अशा घरासाठी गोल इंडक्शन सर्वोत्तम : गोल इंडक्शन साधारणपणे लहान आणि कॉम्पॅक्ट असतात. जर तुमचे स्वयंपाकघर लहान असेल, तर हा आकार तुमच्यासाठी योग्य आहे. ते कमी जागा घेतात आणि प्रवासात सोबत नेण्यास सोपे असतात. तथापि, हे लक्षात ठेवा की जर तुम्ही त्यावर मोठे भांडे किंवा रुंद पातेले ठेवले, तर ते काठावरून सांडेल, ज्यामुळे भांडे असंतुलित होऊ शकते.

» चौकोनी इंडक्शन कुकरचा योग्य वापर : चौकोनी इंडक्शन हे प्रमाणित आकाराचे मानले जातात. जर तुमचे कुटुंब मोठे असेल आणि तुम्ही दररोज इंडक्शनवर स्वयंपाक करत असाल, तर हे तुमच्यासाठी सर्वोत्तम आहे. त्याच्या मोठ्या पृष्ठभागावर मोठ्या तळाचे भांडे, मोठा प्रेशर कुकर किंवा रुंद तवा सहजपणे बसतो. तसेच, यामुळे बटणे आणि टच पॅनलसाठी अधिक जागा मिळते.




### वीज बिलात काही फरक पडतो का?

गोल किंवा चौकोनी इंडक्शनचा तुमच्या वीज बिलावर थेट परिणाम होत नाही, परंतु तुमच्या भांड्यांची निवड आणि वापराच्या पद्धतींमुळे तुमचे बिल कमी-जास्त होऊ शकते. तुमच्या वीज बिलाची रक्कम कॉइल किती वीज वापरते यावर अवलंबून असते. इंडक्शनवरील काच गोल असो वा चौकोनी, आतील तांब्याची कॉइल गोलच असते. जेव्हा इंडक्शन चालू केला जातो, तेव्हा वीज फक्त कॉइलच्या परिघाच्या आतच वापरली जाते. जर तुम्ही २००० वॅटचा गोल इंडक्शन आणि २००० वॅटचा चौकोनी इंडक्शन एकाच पॉवर सेटिंगवर चालवला, तर दोन्ही समान प्रमाणात वीज वापरतील.

## तुम्ही एआय चॅटबॉट्सचा खूप जास्त करता वापर?

### व्हा सावध! तुमची ज्ञान अन् विचार करण्याची क्षमता होतेय कमी...



**जर तुम्ही चॅटजीपीटी, जेमिनी, क्लॉड किंवा ग्रोकसारख्या एआय चॅटबॉट्सशी वारंवार संवाद साधत असाल, तर तुम्ही केवळ चुकीच्या माहितीवर विश्वासच ठेवत नाहीत तर कालांतराने तुमचे ज्ञान आणि विचार करण्याची क्षमतादेखील गमावत आहात. हे आमचे मत नाही, तर मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एमआयटी) च्या संशोधकांचे मत आहे. चॅटबॉट्सशी संवाद साधताना तुमच्या एक गोष्ट लक्षात आली असेल की, ते अनेकदा तुम्ही जे म्हणता त्याच्याशी गरजेपेक्षा जास्त सहमत होतात. जरी हे सुरुवातीला प्रभावी वाटू शकते आणि तुमचे काम लवकर पूर्ण करण्यास मदत करू शकते, तरी ही सोय तुमचे खरे ज्ञान हिरावून घेऊ शकते...**

» एमआयटी संशोधकांचा इशारा : एमआयटीच्या संशोधकांनी मानवी विचार आणि आकलनशक्तीवर एआयच्या (AI) होणाऱ्या परिणामाबद्दल इशारा दिला आहे. एमआयटीच्या दोनपैकी पहिल्या शोधनिबंधात यावर जोर देण्यात आला आहे की, जेव्हा एआय प्रणाली वापरकर्त्यांच्या मतांना सातत्याने मान्यता देतात, तेव्हा ते एक असे फीडबॅक लूप तयार करू शकते जे कालांतराने गैरसमजांना अधिक दृढ करते.

» इतरांकडून शिकणे कमी होईल... : संशोधकांचे म्हणणे आहे की लोकांचे एआय (AI) साधनांवरील वाढते अवलंबित्व हळूहळू मानवाची शिकण्याची आणि आपले ज्ञान वाढवण्याची क्षमता कमी करू शकते. या अभ्यासात असे सुचवले आहे की, जसजसे एआय प्रणाली वैयक्तिकृत उत्तरे आणि सूचना देण्यात अधिक पारंगत होतील, तसतसे वापरकर्ते स्वतःहून माहिती शिकण्यासाठी किंवा त्यावर संशोधन करण्यासाठी कमी प्रयत्न करतील. संशोधक असा इशारा देतात की कालांतराने, एआयवरील अत्याधिक अवलंबित्व कमी संवाद, इतरांकडून शिकण्यात घट आणि ज्ञानात हळूहळू घट होण्यास कारणीभूत ठरू शकते.

» ज्ञान नष्ट होऊ शकते : अत्यंत गंभीर परिस्थितीत, या अवलंबनामुळे ज्ञानाचा ऱ्हास देखील होऊ शकतो, ज्यामुळे माणसांमधील सामान्य ज्ञान कमी होते. एकंदरीत, हे दोन अभ्यास दर्शवतात की एआय मानवी ज्ञान आणि विचारांवर कसा परिणाम करू शकते.

## 1 एप्रिलपासून सुरू झालीये डिजिटल जनगणना

### घरबसल्या तुमचा संपूर्ण तपशील ऑनलाइन भरा, टप्प्याटप्प्याने प्रक्रिया समजून घ्या...

**२०२६ च्या जनगणनेचा पहिला टप्पा १ एप्रिल २०२६ पासून सुरू झाला आहे. सरकारने म्हटले आहे की, यावेळी जनगणना पूर्णपणे डिजिटल असेल. अंदाजे ३० लाख कर्मचारी मोबाईल ॲपद्वारे माहिती गोळा करतील. तुमची इच्छा असल्यास, तुम्ही पहिल्या टप्प्यात तुमचा तपशील ऑनलाइन देखील भरू शकता. हे लक्षात घेण्यासारखे आहे की पहिल्या टप्प्यात तुम्हाला ३३ प्रश्न विचारले जातील. या उद्देशासाठी एक ऑनलाइन पोर्टल सुरू करण्यात आले आहे, जिथे लोक स्वतःची माहिती भरू शकतात. अधिक माहिती देण्यासाठी, पोर्टलवर नेहमी विचारले जाणारे प्रश्न (FAQs) उपलब्ध करून दिले आहेत. जनगणनेच्या या टप्प्याला 'हाउस लिस्टिंग आणि हाउसिंग जनगणना (House Listing and Housing Census) असे म्हटले जाते.**

- **एकदा कुटुंबप्रमुखाचा तपशील नोंदवल्यानंतर तुम्हाला तो बदलता येणार नाही.**
- **एकदा सबमिट केल्यानंतर तुम्हाला उत्तरे बदलता येणार नाहीत.**



### जनगणनेसाठी तुमचा तपशील कसा भरावा?

» सर्वप्रथम, se.census.gov.in या अधिकृत पोर्टलला भेट द्या आणि तुमचे राज्य निवडा.

» यानंतर, तुम्ही कुटुंबप्रमुखाचे नाव आणि मोबाईल नंबर टाकून नोंदणी करणे आवश्यक आहे. हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की एका मोबाईल नंबरसह फक्त एकाच कुटुंबाची नोंदणी केली जाईल आणि कुटुंबप्रमुखाचे नाव बदलता येणार नाही.

» यानंतर, उपलब्ध असलेल्या १६ भाषांमधून तुमची पसंतीची भाषा निवडा.

» आता ओटीपी पडताळणी करा.

» आता तुमचा अचूक पत्ता प्रविष्ट करा. हे करण्यासाठी नकाशावरील लाल मार्कर अचूक ठिकाणी ड्रॅग करा.

» घराच्या सूचीशी संबंधित सर्व ३३ प्रश्नांची अचूक उत्तरे द्या.

» संपूर्ण माहिती प्रविष्ट केल्यानंतर ती काळजीपूर्वक तपासा आणि नंतर सबमिट बटणावर क्लिक करा.

» हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की सबमिट केल्यानंतर तुम्हाला कोणतेही बदल करता येणार नाहीत.


### या प्रश्नांचा तपशील तयार ठेवा...

जर तुम्ही जनगणना २०२६-२७ दरम्यान पहिल्या टप्प्यातील प्रश्न ऑनलाइन भरले, तर तुम्हाला तुमच्या घराशी आणि कुटुंबाशी संबंधित एकूण ३३ प्रश्न विचारले जातील. यासाठी, तुम्ही घराच्या स्थितीबद्दल माहिती तयार ठेवावी, जसे की इमारत आणि घर क्रमांक, फरशी, भिंती आणि छतासाठी वापरलेल्या साहित्याची माहिती, कुटुंबातील सदस्यांची संख्या, कुटुंबप्रमुखाचे नाव, लिंग आणि जात. तुम्हाला पिण्याच्या पाण्याचा स्रोत, वीज, शौचालय, स्वयंपाकघर आणि मुख्य अन्नधान्य यांसारख्या सुविधांबद्दलही प्रश्न विचारले जातील. डिजिटल जग पाहता, इंटरनेट, लॅपटॉप, मोबाईल फोन आणि वाहनांबद्दलची माहिती देखील गोळा केली जाईल.

# अजब-गजब



## विशीच्या युवतीला जडली पेट्रोल पिण्याची हौस



**लंडन** : २० वर्षीय शेन्नॉनला एक लत जडली आहे. लत कोणतीही वाईटच पण शेन्नॉनची ही सवय नुसती वाईटच नाही तर महागडी सुद्धा ठरत आहे. तिला चक्क पेट्रोल पिण्याची हौस आहे. दिवसातून कमीत कमी १२ चमचे पेट्रोल तिला हवेच असते. पेट्रोल पिण्यामुळे गळ्यात जलन होते. पण तरीही पेट्रोल पिणे तिला आवडते. शेन्नॉनने गेल्या वर्षी १९ लिटर पेट्रोल पिले होते. शेन्नॉनच्या आईला तर सुरुवातीला विश्वासच होत नव्हता की, आपली मुलगी पेट्रोल प्यायला लागली आहे. एक दिवस शेन्नॉनच्या तोंडातून पेट्रोलचा वास आल्यानंतर त्यांना खात्री पटली. शेन्नॉनची ही विचित्र सवय आतापर्यंत अनेक टीव्ही वाहिन्यांनी प्रसारित केली आहे. एका वाहिनीशी बोलताना शेन्नॉन म्हणाली होती, की पेट्रोलची खारट-तुरट चव तिला आवडते.

## अद्भूत मुलगा!

### रात्रीच्या काळोखात त्याला स्पष्ट दिसते




**बिजिंग :** त्याचा जन्म झाला तेव्हा त्याचे डोळे सामान्य माणसासारखे काळे किंवा घारे नव्हते तर निळ्या रंगाचे होते. विलक्षण डोळ्यांचा हा बालक आपल्या आई- वडिलांसोबत चीनच्या सुदूर शहराजवळील ग्वांजी गावात राहतो. एवढ्यावरच त्याचे वेगळेपण थांबत नाही. त्याची खरी किमया तर पुढेच आहे. तो रात्रीच्या काळाखोतही स्पष्टपणे बघू शकतो. घुबड, वटवाघूळ या पक्ष्यांना रात्री दिसते, तसेच या बालकाही रात्री दिसते. नॉग युहूई असे या बालकाचे नाव आहे.

नॉगच्या डोळ्यांची आणखी एक विशेषता म्हणजे त्याच्या डोळ्यांवर जेव्हा प्रकाश पडतो तेव्हा त्याचे डोळे सौम्य निळी होऊन चमकू लागतात. एखाद्या प्राण्याच्या किंवा मांजरीच्या डोळ्यावर प्रकाश पडल्यानंतर जसे डोळे चमकतात अगदी तसेच. पहिल्यांदा जेव्हा ही बाब त्याच्या आई-वडिलांना कळली तेव्हा ते चिंतीत झाले. त्यांनी नॉगला स्थानिक डॉक्टरांकडे नेले. डॉक्टरांनी त्यांना सांगितले, की वाढत्या वयासोबत त्याच्या डोळ्यांचा रंगही आपोआप ठिक होईल. नॉग मोठा होत असताना, त्याच्या डोळ्यांतील रात्री दिसण्याची अद्भूत शक्तीही समोर आली. नॉगने सर्वांना सांगितले, की रात्रीच्या अंधारात त्याला स्पष्टपणे दिसू लागले आहे. दिवसापेक्षाही रात्रीच्या अंधारात आपणास चांगले दिसते, असे तो सांगू लागला. रात्रीच्या काळाखोत उंदरालाही त्याने पकडून दाखवले. या घटनेनंतर नॉग रातोरात प्रकाशझोतात आला. त्याच्या विशेषत्वाची माहिती सर्वच देशांच्या वैज्ञानिकांना झाली. तेव्हा अनेक देशांतून डॉक्टर त्याचे डोळे तपासण्यासाठी आले. त्याची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये झाली आहे.

## आकाशात एकाच वेळी दोन सूर्य!

**पेंगू आइलॅन्ड (तैवान) :** रोज सकाळी आपण उठतो तेव्हा आकाशात एकच सूर्य पाहतो... आतापर्यंतच्या इतिहासात कधीही दोन सूर्य उगवल्याचे कुणी पाहिलेही नाही आणि ऐकले नाही. तारे भरपूर असले तरी सूर्य एकच आहे, हे आपण जाणतो... पण तैवानमध्ये चमत्कार घडला. आकाशात चक्क दोन सूर्य दिसले. तैवानच्या पेंगू आइलॅन्डमध्ये घडलेला हा प्रकार लोकांना घाबरवून टाकणारा होता. पण त्यानंतर काहीच विपरित न घडल्याने लोकांनी ईश्वरी लीला मानून सुटकेचा निःश्वास टाकला.

जुन्याजाणत्या लोकांच्या म्हणण्यानुसार, अशा प्रकारे एकाच वेळी दोन सूर्य दिसणे पृथ्वीच्या विनाशाचे संकेत आहेत. ग्लोबल वॉर्मिंगमुळेच दोन सूर्य आकाशात दिसलेत. स्थानिक हवामान विभागाच्या सूत्रांनी सांगितले, की सनडॉग फिनॉमिनामुळे असे घडले आहे. बर्फाच्या रिफ्लेक्शनमुळे सर्वांना आभास झाला की आकाशात एकाच वेळी दोन सूर्य उगवले आहेत. मात्र तरीही अशा प्रकारे दोन सूर्य दिसणेही दूर्मिळ घटना आहे. तज्ज्ञ काही म्हणोत पण लोक प्रचंड भयभीत झाले होते. आपल्या परिसरावर देवाचा प्रकोप तर झाला नाही ना, असे लोकांना वाटत होते. अनेकांनी देवाचीच ही लीला आहे, असे समजून हातही जोडले होते.



## उडत्या हेलिकॉप्टरमध्ये जन्मले बाळ!

**कोलंबो :** आतापर्यंत आपण चालत्या बसमध्ये, विमानात बाळाने जन्म घेतल्याची माहिती ऐकली असेल पण हेलिकॉप्टरमध्ये कुण्या बाळाने जन्म घेतल्याचे फारच कमी ऐकण्यात येते. नुकताच श्रीलंकेत असा प्रकार घडला असून, महापुरातील लोकांना वाचवत असताना ही घटना घडल्याचे वायूसेनेच्या प्रवक्त्याने सांगितले.

श्रीलंकेच्या उत्तर- मध्य प्रांतात गेल्या काही दिवसांत मोठा पाऊस झाला असून, त्यामुळे नद्यांना महापूर आला आहे. महापुराचे पाणी घरात घुसून अनेक लोक बेघर झाले आहेत. अनुराधापूर



जिल्ह्यातील हारोपाथना येथील गावही सध्या पाण्यावर तरंगले आहे. या गावातील नागरिकांना हेलिकॉप्टरद्वारे सुरक्षित स्थळी आणत असताना एका गर्भवती महिलेला हेलिकॉप्टरमध्येच प्रसूती कळा सुरू झाल्या. त्या वेळी हेलिकॉप्टरमध्ये दोन सैनिक आणि चार-पाच गावकरी होते. सैनिकांनी त्याही परिस्थितीत आकाशातच तिची यशस्वी प्रसुती घडवून आणली. सध्या बाळ आणि बाळंतिण दोघेही सुखरूप असून, त्यांना रूग्णालयात डॉक्टरांच्या देखरेखीखाली ठेवण्यात आले आहे.

## आयुष्य नशिबाने नाही, हिंमतीने घडवले जाते...

### हात तुटलेले तरी चालवतो दुचाकी



बिजिंग : चीनमध्ये राहणाऱ्या २७ वर्षीय लियूचे दोन्ही हात कटलेले आहेत. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे तो दुचाकी चालवतो. लियूची ही कहानी तेव्हा उघड झाली जेव्हा चीनच्या पोलिसांनी त्याला लायसन चेक करण्यासाठी पकडले. पोलिसांनी त्याला हात दाखवून थांबवले. गाडी खाली उतरवले, तेव्हा त्याला हातच नसल्याचे पाहून ते हादरूनच गेले.

पोलिसांनी चौकशी केली तेव्हा लियूने आपली कहानी त्यांना सांगितली. लियू जेव्हा सात वर्षांचा होता. तेव्हा विजेचा धक्का बसून त्याचे दोन्ही हात निकामी झाले होते. तो जेव्हा दहा वर्षांचा झाला तेव्हा त्याच्या कुटुंबियांनी त्याला सर्कसमध्ये कामासाठी दाखल केले. तेथेच त्याने विनाहातांनी दुचाकी चालवणे शिकले. पैसे नसल्याने पोलिसांनी लियूला तसेच सोडून दिले. मात्र पोलिसांनी त्याला इशारा दिला की, पुन्हा त्याने गाडी चालवू नये. पण विचार करण्यासारखी गोष्ट आहे, की त्याने दुचाकी चालवणे सोडले तर त्याचे पोट कसे तो भरू शकेल. तीन महिन्यांपूर्वी लियूने सर्कसमध्ये काम करणेही सोडले आहे. त्याने पोलिसांना विनवणी केली की, दुचाकी चालवणे माझ्यासाठी फार महत्त्वाचे आहे. पण पोलिसांना त्याच्या दुचाकी चालवण्यावर अजिबात विश्वास नाही. त्याच्यामुळे कुणाच्या जिवाला धोका निर्माण होऊ शकतो, असे पोलिसांना वाटते.

रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, १७६७७७१९७०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# ‘सायलेंट ऑफ मेजॉरिटी’कडे दुर्लक्ष करू नका -पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार

## ❒ डीजेमुक्त भीम जयंतीसाठी घेतली जयंती मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक



**नांदेड (प्रतिनिधी)**– भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराला अभिप्रेत असलेली भीम जयंती साजरी करण्यासाठी पोलीस अधीक्षकांनी जयंती मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची विशेष बैठक घेऊन मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना सूचना केल्या. सायलेंट ऑफ मेजारिटीकडे दुर्लक्ष करू नका, पोलीस सदैव आपल्या सेवेत असून, कोणीही कायदा हातात घेऊ नये. यावर्षीची भीम जयंती १८ तास अभ्यास, रक्तदान व विविध सामाजिक उपक्रम राबवून पारंपरिक वाद्य लावून डीजे मुक्त करावी, असे आवाहन पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी केले.

पोलीस अधीक्षक कार्यालयातील मंथन सभागृहात जिल्हा विशेष शाखेचे पोलीस निरीक्षक सूर्यकुमार बोलमवार आणि श्यामसुंदर टाक यांनी जयंती मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची, आंबेडकरी चळवळीच्या नेत्यांची, भंते आणि पत्रकार यांची संयुक्त बैठक शुक्रवार, दि. ३ मार्च रोजी आयोजित केली होती. या बैठकीला मार्गदर्शन करताना पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार बोलत होते.

यावेळी अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे, रामेश्वर व्यंजने, पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम, रामेश्वर खनाळ, ओमकांत चिंचोलकर, राजेश पुरी, संतोष तांबे आणि सहायक पोलीस निरीक्षक संतोष जोंधळे यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम भीम जयंती मंडळांचे प्रवीण खंदारे, प्रशीक चित्ते, दीपक राक्षसमारे, राजू लांडगे, नगरसेवक सत्यपाल सावंत, रमेश सोनाळे, प्रफुल्ल सावंत, दुष्यंत सोनाळे, प्रशीक गायकवाड, विठ्ठल गायकवाड, प्रा. अविनाश नाईक, आंबेडकरवादी मिशनचे प्रमुख दीपक कदम, भन्ते पय्याबोधी, भन्ते विनयबोधी, मंगेश कदम यांनी पोलीस प्रशासनाला सूचना केल्या. काहींनी डीजे वाजवू द्यावा यासाठी पोलिसांनी परवानगी द्यावी तर काहींनी डीजेला परवानगी देऊ नये अशी मागणी केली. डीजेमुळे कायदा सुव्यवस्था बाधित होऊ शकतो. पोलिसांची मदत वेळेवर मिळत नाही. कर्णकर्कश आवाजामुळे भीम जयंती मंडळामध्ये अनुचित प्रकार घडण्याची शक्यता अधिक बळावते, त्यामुळे जयंती मंडळांनी डीजेमुक्त, व्यसनमुक्त भीम जयंती साजरी करावी, अशी सूचनाही यावेळी काहींनी केली.

यावेळी भन्ते पय्याबोधी, भन्ते विनयबोधी यांनी सविस्तर मार्गदर्शन केले आणि आंबेडकरी समाज शांतता प्रिय असून, पोलीस प्रशासनाला सहकार्य करणारा आहे. जयंती मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी डीजे न लावता जमा झालेल्या निधीमधून विहारांमध्ये ग्रंथालय किंवा समाजातील गोरगरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करावे, असेही आवाहन केले. तसेच भन्ते शीलरतन यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात कुठलेही रस्त्यावर दुकाने थाटू देऊ नये, मंडप टाकू देऊ नये. जेणे करून बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी आलेल्या आंबेडकरवाद्यांना अडथळा होऊ नये, असेही काहींनी सूचित केले.

## महापौर कविताताई मुळे व प्रभाग ७ मधील नगरसेवकांचा ७ एप्रिल रोजी सत्कार

**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड शहराच्या प्रथम नागरिक तथा नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या नूतन महापौर सौ. कविताताई संतोष मुळे व प्रभाग क्रमांक सात मधील नवनिर्वाचित नगरसेवकाचा सहृदय सत्कार दिनांक सात एप्रिल २०२६ रोजी, सायंकाळी सहा वाजता, हनुमान मंदिर मंगल कार्यालय, विजयनगर नांदेड येथे संपन्न होणार आहे.

हनुमान मंदिर मंगल कार्यालय, विजयनगर हाऊसिंग सोसायटी, विजयनगर सार्वजनिक वाचानालय व प्रभागातील सर्व जनतेच्या वतीने हा विशेष सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. विविध सामाजिक उपक्रमासाठी नेहमीच पुढाकार घेणाऱ्या हनुमान मंदिर मंगल कार्यालय कमिटी, विजयनगर हाउसिंग सोसायटी व वाचनालयाच्या वतीने होणाऱ्या या भव्य सत्कार सोहळ्यासाठी प्रभागातील व नांदेड शहरातील विकासप्रेमी जनतेनी उपस्थित राहावे असे आवाहन संयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे.

# अर्धापुरात आज विविध विकासकामांचे भूमिपूजन

## खा. अशोकराव चव्हाण, आ. श्रीजया चव्हाण यांची जाहीर सभा

**अर्धापूर (प्रतिनिधी)** –शहरात विविध विकासकामे मार्गी लागली असून, शनिवार, दि. ४ एप्रिल रोजी सकाळी ९ वा. ७ कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचे भूमिपूजन करण्यात येणार आहे. तसेच माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, आ. श्रीजया चव्हाण यांची नवी अबादी परिसरात जाहीर सभा आयोजित करण्यात आली असल्याची माहिती संयोजकांनी दिली.

शहरातील विविध विकासकामांचे भूमिपूजन माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, आ. श्रीजया चव्हाण यांच्या हस्ते होणार आहे. डॉ. शरद चरखा यांच्या दवाखान्याजवळ विविध विकास कामांचे भूमिपूजन, दुर्गा नगर येथे बांधकाम विभागाचे काम, दास नगरात अंगणवाडीचे भूमिपूजन, लंगडे गल्लीत रस्त्याची पाहणी, ईदगाह परिसराची पाहणी, नगरसेवक गाजी काजी यांच्या निवासस्थानी ईद निमित्त कार्यक्रमास उपस्थित, नवी अबादी परिसरात रस्ता व विविध कामांचे भूमिपूजन होणार आहे.



तसेच नवी आबादी परिसरात जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले असून, या सभेसाठी शहरातील सर्व जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन नगराध्यक्षा सौ. वैशालीताई देशमुख, उपनगराध्यक्ष मुक्तेदर खान पठाण, माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, नगरपंचायत मुख्यधिकारी जगदीश दळवी, गटनेत्या सौ. शालिनीताई शेट्टे, नगरसेवक बाबुराव लंगडे, सौ. मीनाक्षी राऊत, सौ. पल्लवी लंगडे, सोनाजी सरोदे, प्रल्हादराव माटे, नगरसेवक गाजी काजी, मुस्वीर खतीब, नामदेव सरोदे, सलिम कुरेशी यांनी केले आहे.

# दारूच्या नशेत मुलाकडून जन्मदात्याचा खून

**नांदेड (प्रतिनिधी)** – नायगाव शहरातील पानसरेनगर परिसरात मुलानेच जन्मदात्या वडिलाचा खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. या घटनेने संपूर्ण परिसर हादरून गेला आहे.

मारोती माणिका गटलेवार (वय ६५, सध्या रा. पानसरे नगर, नायगाव, मूळ रा. कौठा ता. कंधार) व त्यांचा मुलगा नामदेव मारोती गटलेवार (वय ३५) हे काही दिवसांपूर्वी उदरनिर्वाहासाठी नायगाव येथे वास्तव्यास आले होते. मारोती हे मानसिकदृष्ट्या काहीसे अस्थिर असल्याचे सांगितले जाते, तर नामदेव हा स्थानिक कापड दुकानात मुनीम म्हणून काम करत होता. मात्र, नामदेवला दारूचे व्यसन जडले होते. त्याच्या व्यसनाधीनतेमुळे घरात सतत वाद होत असत. या परिस्थितीला कंटाळून त्याची पत्नी माहेरी निघून गेल्याची माहिती आहे. वडील आणि मुलामधील तणाव दिवसेंदिवस वाढतच होता. बुधवारी रात्री पुन्हा बाप-लेकात जोरदार वाद झाला. हा वाद इतका टोकाला गेला की, संतापाच्या भरात नामदेवने वडील मारोती यांच्यावर जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात मारोती यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती गुरुवारी सकाळी मिळताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत आरोपी नामदेवला अटक केली.

# खोलेश्वर विद्यालयात फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** –तणावमुक्त व आरोग्यसंपन्न जीवनातून शारीरिक व मानसिक कार्यक्षमता वृद्धींगत करण्यासाठी इंटरनॅशनल माईंड पॉवर ट्रेनर तथा विश्वप्रसिध्द लाईफ स्किल कोच इंजि. शिवाजीराजे पाटील बाभळीकर यांनी मागील तीन दशकांच्या अनुभवातून व मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून तयार केलेल्या अभ्यासक्रमावर आधारित एक दिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामचे (एफडिपी) आयोजन रविवार, दि. १२ एप्रिल रोजी करण्यात आले आहे, अशी माहिती संस्थाध्यक्ष दिलीप पारेकर व प्राचार्य सरिता फपाळ यांनी दिली आहे.

राजमाता जिजाऊ बहुउद्देशीय संस्था संचालित खोलेश्वर विद्यालयाच्या सभागृहात सकाळी दहा ते संध्याकाळी साडेचार वाजेपर्यंत पॉवर ऑफ सबकॉन्शियस माईंड, रिलेशनशिप विथ स्टुडंट अँड पॅरेंट, रिस्पॉन्सिबिलिटी आणि पॉझिटिव्ह मेंटल एटिट्युड, सेल्फ टॉक अँड कम्युनिकेशन स्किल अशा चार सत्रात संपन्न होणाऱ्या एफडीपीची सर्वांना उत्सुकता लागली असल्याचे प्रा. स्वानंद फपाळ यांनी सांगितले आहे.



# अवैध सावकारी व्यवसाय करणाऱ्यांना अटक; एलसीबी पथकाची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहरामध्ये अवैध सावकारी व्यवसाय करून पैसे परत न करणाऱ्या लोकांना डांबून ठेवून खंडणी मागणाऱ्या गुन्ह्यातील पाच जणांना स्थानिक गुन्हा शाखेने अवघ्या तीन तासांत बेड्या ठोकल्या आहेत. यातील चौघेजण फरार असून, गुन्ह्यात एका अल्पवयीन बालकाचाही समावेश आहे. या पाचही जणांना स्थानिक गुन्हा शाखेने पुढील कारवाईसाठी भाग्यनगर पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

भाग्यनगर आणि अर्धापूर पोलीस ठाण्यांतर्गत सावकारी अधिनियमांतर्गत दाखल असलेल्या गुन्ह्यातील आरोपी हे साठे चौकाजवळ खालसा फायनान्स गुरुकृपा ट्रेडर्स येथील कार्यालयाच्या बाहेर थांबले असल्याची माहिती स्थानिक गुन्हा शाखेला मिळाली. ही माहिती मिळताच स्थानिक गुन्हा शाखेचे पथक तेथे पोहोचले. तेथे मजहर खान नवीद खान (वय ३८ रा. अमन कॉलनी नुरी चौक माळ टेकडी रोड), अभिजीत प्रकाश सूर्यवंशी (वय १८ वर्षे रा. विष्णूनगर), सुमित रामदास ढवळे (वय २२ वर्षे, रा. संघसेनगर इतवारा), अभय गौतम भुजबळे (वय १९ रा. गौतमनगर किल्ला रोड) आणि अनिकेत राजू हिरापूरम (वय १८ वर्षे रा. नारायण नगर) या पाच जणांना ताब्यात घेण्यात आले. हे सर्वजण खालसा फायनान्समध्ये खासगी नोकरी करतात.



त्यांनी पीरबुऱ्हाण नांदेड येथील आबेद अली चाऊस यांच्याकडील फायनान्सची वसुली करण्यासाठी २८ मार्च २०२६ रोजी त्यांच्या घरी गेले. ते फायनान्सचे पैसे देत नसल्याने त्यांना जबरदस्तीने मोटारसायकलवर बसून खालसा फायनान्स ऑफिसमध्ये मारहाण करून डांबून ठेवले. त्याचवेळी अर्धापूर येथून समाधान जोंधळे यांनाही मारहाण करून ऑफिसमध्ये डांबून ठेवले. त्यांनी पैसे दिल्यानंतर सोडून दिले. हे दोन्ही गुन्हे त्यांनी सोहेल खान रा. नुरी चौक, सय्यद आजम रा. इस्लामपुरा, शुभम कांबळे रा. श्रावस्ती नगर आणि मॉन्टेसिंघ मेजर फायनान्स मालक तसेच एक विधी संघर्षग्रस्त बालक यांच्यासह मिळून केल्याची कबुली दिली. या प्रकरणात अर्धापूर आणि भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## लक्ष्मण सोनसळे यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)** – सेवानिवृत्त कृषी सहाय्यक लक्ष्मण तुकाराम सोनसळे (वय ७०) रा. काकाडी यांचे गुरुवार, दि. २ एप्रिल रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवार, दि. ३ एप्रिल रोजी काकांडी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा ४ मुली, नातू असा परिवार आहे.



# परशुराम जयंतीनिमित्त नांदेडमध्ये विविध कार्यक्रम

**नांदेड (प्रतिनिधी)** –परशुराम जयंतीनिमित्त अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ, नांदेडच्या वतीने १७, १८ व १९ एप्रिल रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

नांदेडमध्ये परशुराम जयंतीनिमित्त यावर्षी प्रथमच व्यापक स्वरूपात कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. कुसुम सभागृहात सलग तीन दिवस हे कार्यक्रम होणार असल्याने या कार्यक्रमाची जय्यत तयारी अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या वतीने सुरू आहे.

शुक्रवार, दि. १७ एप्रिल रोजी सायं. ८.३० ते १० या वेळेत प्रखर हिंदुत्व या विषयावर प्रसिद्ध अभिनेते शरद पोंक्षे आपले विचार मांडणार आहेत. कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष कॅप्टन आशिष दामले उपस्थित राहणार आहेत. निवेदक म्हणून ॲड. गजानन पिंपरखेडे व अश्विनी चौधरी काम पाहणार आहेत. शनिवार, दि. १८ एप्रिल रोजी सायं. साडेसात ते साडेदहा या वेळेत ‘प्रत्येक युगातील ब्राह्मण’या विषयावर अतुल शास्त्री भगरे गुरुजी यांचे व्याख्यान होईल. तर महंत सुधीरदास यांचे रविवार, दि. १९ एप्रिल रोजी परशुरामांची शिष्य परंपरा या विषयावर व्याख्यान होणार आहे. तसेच भक्ती संध्या कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात आले असल्याची माहिती अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर प्रदेशाध्यक्ष यांनी दिली आहे.




# ज्येष्ठ नागरिकांच्या प्रलंबित मागण्यांविषयी शासनाने निर्णय घ्यावा - डॉ. हंसराज वैद्य

**नांदेड (प्रतिनिधी)** – ज्येष्ठ नागरिकांच्या प्रलंबित मागण्यांबाबत शासनाने निर्णय घ्यावा, अशी मागणी ज्येष्ठ नागरिक संघ फेडरेशनचे डॉ. हंसराज वैद्य यांनी केली आहे.

नुकतेच विधानसभेत ज्येष्ठ नागरिकांना विविध सेवा-सुविधा उपलब्ध करून देण्यासंदर्भात एक महत्त्वपूर्ण विधेयक (ज्येष्ठ नागरिक सेवा-सुविधा इ. उपलब्ध करून देणे २०२५ क्रं.७२) मांडण्यात आले होते.



त्यानंतर २५ जुलै रोजी महाराष्ट्र शासनाने राजपत्र (असाधारण भाग पाच) प्रसिद्ध करून ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणासाठी काही महत्त्वाच्या तरतुदीही विचाराधीन असल्याचे जाहीर केले.

यामध्ये दरमहा ७ हजार रुपये आर्थिक सहाय्य व महाराष्ट्र दर्शनासाठी वार्षिक पंधरा हजार रुपये, आरोग्य सेवेसाठी ५ लाख रुपयांपर्यंत मदत, निराधार व निराश्रित ज्येष्ठ नागरिकांसाठी निवास व भोजनाची सोय, तसेच तक्रार निवारणासाठी टोल-फ्री हेल्पलाईन अशा सुविधा जाहीर करण्यात आल्या होत्या. मात्र, या सर्व घोषणा कागदावरच राहिल्या असून, प्रत्यक्षात अंमलबजावणी होत नसल्याचे डॉ. हंसराज वैद्य यांनी म्हटले आहे.

# गोकुंद्यातील गॅस एजन्सीवर बेकायदेशीर व्यवहाराचा आरोप; चौकशीची मागणी



**किनवट (प्रतिनिधी)** –गोकुंदा येथे सेवारत असलेल्या गॅस एजन्सीच्या कामकाजावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत. संबंधित एजन्सीची अधिकृत मंजुरी सारखणी (ता. किनवट) येथे असताना शासनाच्या नियमांनुसार ज्या ठिकाणी मंजुरी आहे त्याच ठिकाणी गॅस सिलेंडरचा व्यवसाय करणे बंधनकारक असताना प्रत्यक्षात मात्र ही एजन्सी सारखणी व गोकुंदा (किनवट) येथे व्यवहार करत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे हा प्रकार बेकायदेशीर असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

दरम्यान, गोकुंदा येथे नागरी वस्तीला लागूनच गॅस सिलेंडर साठवणूक व वितरण केले जात असल्याने सुरक्षेचा प्रश्नही निर्माण झाला आहे. याचबरोबर मागील काही दिवसांपासून गॅस सिलेंडरची तीव्र टंचाई जाणवत असून, ग्राहकांना सकाळपासून लांबच लांब रांगा लावाव्या लागत आहेत. सिलेंडर उपलब्धतेतील अनियमिततेमुळे काळाबाजार होत असल्याचीही शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे सर्वसामान्य ग्राहकांना मोठा आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. या सर्व प्रकाराची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच गॅस वितरण प्रक्रियेत पारदर्शकता आणावी, अशी मागणी किनवट तालुका ग्राहक पंचायतीतर्फे करण्यात आली आहे.

# व्यापाऱ्याला खंजर दाखवून लुटणाऱ्या दोघांना एलसीबीच्या पथकाने केली अटक, ३ जण फरार; ४ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहराच्या जुना मोंढा भागात असलेल्या अरबुदा ट्रेडिंग या दुकानात अनोळखी तीन चोरट्यांनी घुसून दुकानदारास खंजरचा धाक दाखविला आणि दहा लाख पन्नास हजार रुपये असलेली बॅग जबरीने चोरून नेली. ही घटना ३० मार्च रोजी रात्री आठच्या सुमारास घडली. याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे व वजिराबाद पोलिसांच्या संयुक्त कारवाईत दोघांना अटक करण्यात आली आहे. अटक केलेल्या आरोपींकडून रोख अडीच लाख रुपये आणि एक दुचाकी असा चार लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दुकानदार सोहनलाल मोंतीलाल परमार (वय ४०, रा. तरोपंती भवन, नेहरू रोड, जालना) हे आपल्या कार्यालयात असताना आरोपींनी ऑफिसमध्ये घुसून खंजरचा धाक दाखवला व त्यांच्या जवळील १० लाख ५० हजार रोख रकमेची बॅग जबरदस्तीने चोरून नेली. सोहनलाल परमार यांच्या फिर्यादीवरून वजिराबाद पोलिसांनी अनोळखी तीन चोरट्यांविरुद्ध जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला होता. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक लोंढे करत आहेत.

या प्रकरणाचा पोलिसांनी उलगडा केला असून, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे यांच्या पथकाने आणि पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांच्या गुन्हे शोध पथकाने काही तासातच दोन आरोपींना अटक केली. अटक केलेल्या आरोपीमध्ये भ्रतरीनाथ उर्फ भरत रवींद्र पवार (वय २५ रा. राम मंदिरामागे जुना मोंढा नांदेड), नागेश छत्रपती वाहुळकर (वय १९ रा. जिल्हा परिषद शाळेजवळ गुंज ता. वसमत) या दोघांना अटक केली. नागेश वाहुळकर यांच्या ताब्यातून रोख अडीच लाख रुपये आणि एक दीड लाख रुपयांची दुचाकी असा चार लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. त्यांना अधिक विश्वासात घेऊन विचारपूस केली असता त्यांनी किशन राजू कुरील (वय २२ राहणार गायत्री मंदिर जुना मोंढा नांदेड), निखिल संभाजी वाठोरे (वय २२ गायत्री मंदिर जुना मोंढा नांदेड) आणि महेश शिंदे रा. शंकरनगर वसरणी यांच्यासोबत गुन्हा केल्याची कबुली दिली आहे. किशन कुरील, निखिल वाठोरे आणि महेश शिंदे तिघेजण फरार असल्याचे पोलिसांनी सांगितले.



**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४
ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com